सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.org

एप्रिल ते जून २०२५

# क्षणचित्रे




प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभा प्रसंगी मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, श्री.शिवराज सिंह चौहान प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत १० लक्ष घरांचे उद्दिष्ट मंजुरीचे पत्र मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्त




प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभा प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते 'अमृत महा आवास अभियान गौरवगाथा' पुस्तिकाचे प्रकाशन




प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभा प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात चावी देवून सन्मानित




प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभा प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते 'अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे<br>संचालक,<br>ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>सुनिल मोरे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

## अनुक्रमणिका


| अं.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ | ३ |
| ३ | ग्रामीण गृहनिर्माण १०० दिवसीय कृती आराखडा फलश्रुती | ६ |
| ४ | अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार | ९ |
| ५ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | १० |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १४ |
| | समन्वय उपक्रम | १६ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | १९ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ | २० |
| | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ | २१ |
| | रमाई आवास योजना | २२ |
| | शबरी आवास योजना | २३ |
| | पारधी आवास योजना | २४ |
| | आदिम आवास योजना | २५ |
| | प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान | २५ |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | २६ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २६ |
| | मोदी आवास घरकुल योजना | २७ |
| ७ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ८ | फोटो गॅलरी | ३४ |
| ९ | मिडिया कवरेज | ३५ |



वर्ष ५ वे । अंक २० वा । एप्रिल ते जून २०२५


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



डॉ. राजाराम दिघे
संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य

माहे एप्रिल ते जून २०२५ या तिमाही अंकाच्या माध्यमातून आपणाशी संवाद साधताना मला अतिशय आनंद होत आहे. या अंकामध्ये मागील तीन महिन्यातील घडामोडींच्या आढाव्या सोबतच ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीतील महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या तिमाहीत, गृहनिर्माण योजनांचा आत्मा महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आणि लाभार्थी मेळाव्यात पूर्णपणे दिसून आला. हा सोहळा अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समर्पित कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांचा पुरावा होता. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, हा लाभार्थ्यांसाठी अभिमानाचा आणि भावनिक क्षण होता. त्यांना त्यांच्या नवीन घरांच्या चाव्या मिळताना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून या कामाचे महत्त्व किती आहे, याची आठवण झाली.

विविध शासकीय विभाग आणि खंबीर राजकीय नेतृत्वामधील अखंड सहकार्य या यशामागील एक प्रेरणादायी शक्ती आहे. आपल्या राजकीय व प्रशासकीय अविचल दृष्टीकोनामुळे आणि वचनबद्धतेमुळे या योजना पारदर्शकपणे, कार्यक्षमतेने आणि सर्वात गरजू लोकांपर्यंत पोहोचण्यावर लक्ष केंद्रित करून राबविल्या गेल्या आहेत. गेल्या काही महिन्यांतील यश पाहताना, आपण केवळ आकडेवारी आणि संख्या पाहत नाही, तर आपण अशा कुटुंबांच्या कथा पाहत आहोत, ज्यांचे आयुष्य मूलभूतपणे बदलले आहे. आपण अशा समुदायांना पाहत आहोत, जे आता भरभराटीसाठी अधिक सुसज्ज आहेत. हे त्रैमासिक याच कथांना समर्पित आहे. सशक्तीकरण आणि प्रगतीच्या अशा कथा, ज्या खऱ्या अर्थाने महा आवास अभियानाची व्याख्या करतात.

मागिल काही महिन्यांत महाराष्ट्राला देशातील कोणत्याही राज्यापेक्षा सर्वाधिक **३० लाख घरकुलांचे ऐतिहासिक उद्दिष्ट** मिळाले आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी राज्य सरकारने **१०० दिवसांचा विशेष कार्यक्रम** जाहीर केला. या कार्यक्रमा अंतर्गत अवघ्या **४५ दिवसांत २० लाख घरांना मंजुरी आणि १० लाख घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित** करण्यात आला, जे १०० दिवसांच्या उद्दिष्टापेक्षाही खूप कमी वेळेत पूर्ण झाले. या विक्रमी कामगिरीमुळे ग्रामीण भागामध्ये **सुमारे ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक** होत आहे. याचा मला अतिशय आनंद आहे. ही कामे वेळेत पुर्ण करण्याचे आपल्यापुढे मोठे आव्हान असले, तरी आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे आव्हान निश्चितच विहीत वेळेत पार पाडू, याची मला खात्री आहे.

**पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजनेतून जमीन खरेदीसाठी १ लाख रुपये** देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून घरकुलांसाठी **वाळू मोफत** उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानात राज्य शासनाच्या हिश्श्यातून **५०,०००/- रुपयांची अतिरिक्त वाढीचा** निर्णय घेण्यात आला. यापैकी **३५,०००/- रुपये घरकुल बांधकामासाठी** आणि **१५,०००/- रुपये प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत छतावर १ KW पर्यंत सौर ऊर्जा यंत्रणा उभारणीसाठी** दिले जातील. जे लाभार्थी सौर ऊर्जा यंत्रणा उभारणार नाहीत, त्यांना हे १५,०००/- रुपये अनुदान मिळणार नाही. मनरेगा (MNREGA) अंतर्गत प्रत्येक घरकुलासाठी २८,०००/- **रुपयांचा रोजगार** उपलब्ध करून दिला जातो. मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या सक्त सुचनांनुसार लाभार्थ्यांना जागा, वाळू व नरेगाच्या लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, याची दक्षता आपणा सर्वांना घ्यावी लागणार आहे.

**१०० दिवसीय महा आवास अभियानामध्ये** अनेक महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात आले असून यामध्ये ५,००० उद्दिष्टाच्या तुलनेत **२३,३३३ भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता**, १३ लाख उद्दिष्टापैकी **१३,६०,०८४ (१०४.६%) घरकुलांना मंजुरी**, ३ लाख उद्दिष्टापैकी १२,८०,०७८ (४२६.७%) लाभार्थ्यांना पहिला हप्त्याचे वितरण म्हणजेच **२०५३.८ कोटी रुपये वितरित** करण्यात आले आहेत. १ लाख उद्दिष्टापैकी **१,४८,५४२** (१४८.५%) **घरकुले पूर्ण** केली. तसेच **बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी आणि हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी** करण्यावर भर दिला आहे. यामुळे कमी जागेत अधिक लाभार्थ्यांसाठी घरे उभारणीचा मार्ग मिळाला आहे.

या १०० दिवसीय कार्यक्रमामध्ये '**लँड बँक**' **आणि** '**सँड बँक**' उभारणे, '**घरकुल मार्ट**' सुरू करणे, गृह कर्ज उपलब्धतेसाठी सहकार्य करणे, वाळूला पर्याय म्हणून क्रश सॅण्डचा वापर करणे, '**मॉडेल हाऊसेस**' (फरशी, रंगरंगोटी, किचन गार्डन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा साधने) उभारणे, इ. **नावीन्यपूर्ण उपक्रम** राबविल्यामुळे लाभार्थ्यांना फायदा होत आहे. आपल्या स्तरावरून या उपक्रमांना आपण प्रोत्साहन देत आहात. आपण **डिजिटल उपक्रम राबवित असून यामध्ये** '**आवास मित्र ॲप**', '**भूमीलाभ पोर्टल**', '**महा आवास अभियान डॅशबोर्ड**' आणि '**महा आवास त्रैमासिक**' यांचे उद्‌घाटन व प्रकाशन करण्यात आले आहे.

या अंकामध्ये देण्यात आलेल्या यशोगाथा महत्त्वपुर्ण असून यांचा थोडक्यात उल्लेख करणे मला महत्वाचे वाटते. **ससेगाव ग्रामपंचायत, नागपूर (गोपाळ टोली)**: नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यातील ससेगाव ग्रामपंचायतीतील गोपाळ टोली येथे अनेक कुटुंबे झोपड्यांमध्ये राहत होती. ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन गावठाणाची **१ एकर जागा नियमित करून ७५ लाभार्थ्यांना ५०० चौ. फूट जागा उपलब्ध करून दिली.** यापैकी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २४ लाभार्थ्यांना घरकुलांना मंजुरी मिळाली आणि ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत युवकांनी गृहसंकुल उभारले, ज्यामुळे घरांसोबत रोजगारही मिळाला. **बेलुरा, अकोला (श्री. पंजाब तुळशीराम सोळंके)**: अकोला जिल्ह्यातील बेलुरा गावात श्री. पंजाब सोळंके यांनी शबरी आवास योजनेअंतर्गत बहुमजली इमारत उभारून इतरांना प्रेरणा दिली. त्यांच्या यशाने प्रेरित होऊन इतर तीन कुटुंबांनीही बहुमजली इमारती बांधण्यास पसंती दिली आहे. **गणोरी, छत्रपती संभाजीनगर (भिल्ल समाज)**: फुलंब्री तालुक्यातील गणोरी गावात भिल्ल समाजाची ४५ कुटुंबे अनेक वर्षापासून वनविभागाच्या जमिनीवर झोपड्यांमध्ये राहत होती. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजनेतून **२० गुंठे जागा खरेदी करून २१ भूमिहीन लाभार्थ्यांना गृहसंकुल उभारण्यात** यश आले. **ढेकवद, नंदुरबार (श्री. तिथ्या रेसा वसावे व श्री. राजेश तिथ्या वसावे)**: नंदुरबार जिल्ह्यातील ढेकवद गावात श्री. तिथ्या वसावे आणि श्री. राजेश वसावे या आदिवासी कुटुंबांनी कमी जागेत दोन मजली (G+१) बहुमजली इमारत उभारली. त्यांना मनरेगा, स्वच्छ भारत मिशन, जल जीवन मिशन, उज्ज्वला योजना, सौभाग्य योजना यांसारख्या विविध शासकीय योजनांचा लाभही मिळाला. **शिरवडे, सातारा (नंदीवाले वस्ती)**: सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील शिरवडे गावातील १० लाभार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत गृहसंकुलाची उभारणी केली आहे. **पालस, रायगड (श्री. बाबू सायबू जाधव व श्री. तुकाराम सायबू जाधव)**: रायगड जिल्ह्यातील पालस गावातील बाबू आणि तुकाराम जाधव या दोन भावांनी प्रधानमंत्री-जनमन आवास योजने अंतर्गत बहुमजली घर बांधून कमी जागेच्या समस्येवर मात केली. या यशोगाथा आपणास प्रेरीत करत असून याद्वारे अनेक नाविन्यपुर्ण उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळत आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त "**अमृत महा आवास अभियान २०२२-२३**" राबविण्यात आले. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **राज्यस्तरीय पुरस्कार (सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)** देऊन गौरवण्यात आले. यात कोकण, नाशिक, नागपूर विभागांनी सर्वोत्कृष्ट विभागांचे पुरस्कार जिंकले, तर अहिल्यानगर, सिंधुदुर्ग आणि गोंदिया जिल्ह्यांनी सर्वोत्कृष्ट जिल्ह्यांचे पुरस्कार पटकावले. '**अमृत महा आवास अभियान गौरवगाथा**' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. येत्या कालावधीत महा आवास अभियान ४ व ५ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा नियोजित आहे.

मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांच्या प्रोत्साहनामुळे आपल्या कामास हुरूप येतो व आपली जबाबदारी वाढते. मा. उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितले की, केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी **निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.** मा. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी "**बेघरमुक्त महाराष्ट्र**" करण्याचे आवाहन केले असून, प्रत्येक घराला लक्ष्मीचे नाव (घरातील महिलेचे नाव) असावे, जेणेकरून घरे अधिक समृद्ध होतील अशी अपेक्षा व्यक्त केली. मा. केंद्रीय मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांनी विश्वास व्यक्त केला की, महाराष्ट्रात नवीन सर्वेक्षणानंतर (२०१८ च्या यादीतून सुटलेल्यांसाठी) घरे देण्याचे काम केले जाईल आणि **१५,०००/- रुपये मासिक उत्पन्न असलेल्यांना तसेच दुचाकीधारक आणि अडीच ते पाच एकर सिंचनाखालील जमीन असलेल्या लाभार्थ्यांनाही घरे दिली जातील.**

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित आणि सन्मानाचे घर मिळावे या उद्देशाने आपण काम करत असून, महाराष्ट्राला " **बेघरमुक्त राज्य**" बनवण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल होत आहे, यात शंका नाही. मागील अंकाप्रमाणे हा अंकही आपणास आवडेल याची खात्री आहे. अनेक शुभेच्छासह!



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,**
**महाराष्ट्र राज्य**

# प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान २०२२-२३ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ

दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या आई.सी.ए.आर.-अटारी, पुणे येथील किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी संम्मेलनामध्ये मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त लक्ष मंजुरीची घोषणा केली. तसेच याबाबतचे पत्रही मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांना दिले.



त्यामुळे देशातील कोणत्याही राज्यापेक्षा सर्वाधिक महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांसाठी केंद्राकडून २० लाख घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले. या उद्दिष्टपूर्तीसाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांच्या विशेष कार्यक्रमाची घोषणा केली. त्यानुषंगाने मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत 'महा आवास अभियान २०२४-२५' राबविण्याचा निर्णय घेतला.त्याचेच फलस्वरूप महाराष्ट्र राज्यात अत्यंत अल्प कालावधीत विक्रमी २० लक्ष लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी दिली आहे.




दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी बॅडमिंटन हॉल, श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे मा.केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय, भारत सरकार श्री.अमित शाह यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत २० लाख घरकुल मंजुर व त्यापैकी १० लाख घरकुल लाभार्थ्यांना प्रथम हप्ता रक्कम रू.१५ हजार प्रती लाभार्थी याप्रमाणे एकूण रक्कम रू.१५०० कोटी इतका निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर एका क्लिकवर जमा करण्यात आली.




याप्रसंगी मा.केंद्रीय राज्यमंत्री, सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार श्री.मुरलीधर मोहोळ, मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद प्रा.राम शिंदे, मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य श्री.चंद्रकांत पाटील, मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण श्री.दत्तात्रय भरणे, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, डॉ.निलम गोऱ्हे, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.योगेश कदम, मा.राज्यमंत्री, नगर विकास व सामाजिक न्याय श्रीमती माधुरी मिसाळ, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग श्री.चंद्रकांत पुलकुंडवार, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे श्री.गजानन पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

मा.केंद्रीय मंत्री,ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान २०२२-२३ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी बॅडमिंटन हॉल, श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झाला.



यावेळी मा.केंद्रीय मंत्री,ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांच्या शुभहस्ते सन २०२४-२५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्ण करणाऱ्या निवडक लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मानित करण्यात आले. तसेच भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सन २०२२-२३ मध्ये राबविण्यात आलेल्या '**अमृत महा आवास अभियान २०२२-२३**' या अभियान कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तिंना राज्यस्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरीत करण्यात आले. यावेळी राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाकरीता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्ण केलेले निवडक लाभार्थी, पुरस्कार विजेत्या संस्था व व्यक्ति, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांचे घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमाकरीता जिल्हास्तरावर मा.पालकमंत्री, मा.खासदार, मा.आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हास्तरावरील सर्व पदाधिकारी व संबंधित अधिकारी, तालुकास्तरावर पंचायत समितीचे सभापती, तालुकास्तरावरील सर्व पदाधिकारी व संबंधित अधिकारी, ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीचे सरपंच, लाभार्थी, ग्रामस्थ व ग्रामस्तरावरील सर्व पदाधिकारी, संबंधित अधिकारी व कर्मचारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांचे स्वागत मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी पुष्पगुच्छ देवून केले. महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस व मा.उप मुख्यमंत्री, श्री.अजित पवार यांचे स्वागत मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम यांनी पुष्पगुच्छ देवून केले. त्याचप्रमाणे मंचावर उपस्थित इतर मान्यवरांचे स्वागत मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी पुष्पगुच्छ देवून केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी मांडले. त्यानंतर राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांतर्गत राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांवर आधारीत लघुपट दाखविण्यात आला. अमृत महा आवास अभियान मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींची 'गौरवगाथा' या पुस्तिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाविषयी महाराष्ट्र राज्याचे मा.उप मुख्यमंत्री, मा.मुख्यमंत्री व मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय यांनी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी केले.





## एकही लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार नाही, ग्रामविकास खात्याचा निर्धार

### - मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे



दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना(ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडतांना मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे यांनी सांगितले की, आजचा दिवस आपल्या सगळ्या महाराष्ट्राच्या गोरगरीब जनतेसाठी खूप महत्त्वाचा दिवस आहे. आपल्या सगळ्यांना माहिती आहे माननीय पंतप्रधान महोदयांचे "सर्वांसाठी घरे" हे स्वप्न असून हे स्वप्न पूर्णत्वाला नेण्यासाठी आपण सगळेजण काम करत आहोत.

२० लाख घरांचे विक्रमी उद्दिष्ट मिळाल्यामुळे महाराष्ट्राचा गेल्या अनेक वर्षाचा प्रधानमंत्री आवास योजनेचा बॅकलॉग आता पूर्णत्वाला जातोय. शंभर दिवसांमध्ये वीस लाख घरांना मंजुरी आणि दहा लाख घरांचा पहिला हप्ता लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे अशा पद्धतीचे उद्दिष्ट माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला दिलं होते. आम्हाला अभिमान आहे आमच्या ग्रामविकास खात्याच्या सगळ्यांनी मेहनत घेतली आणि हे उद्दिष्ट ४५ दिवसांमध्ये पूर्ण केलं. या सभागृहामध्ये लाभार्थ्यांना मंजुरीपत्र आणि पहिला हप्ता वितरण कार्यक्रम माननीय अमित भाईंच्या उपस्थितीत संपन्न झाला.

५० हजार रुपये अतिरिक्त अनुदान घरकुलाला महाराष्ट्र सरकारच्या वतीने देण्याचा निर्णय सरकारने घेतला. घरकुलाला वाळू मोफत आणि भुमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करून त्या लाभार्थ्यांचे घर पूर्ण करण्याच्या सूचना सगळ्या विभागांना दिल्या. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून जमीन खरेदीसाठी एक लाख रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतला. २० लाख घरे येणाऱ्या एक वर्षांमध्ये पूर्ण करण्याच्या अनुषंगाने अर्थखात कामाला लागले असून याकरीता मी अजित पवार साहेबांना मनापासून धन्यवाद देतो.

मनरेगासाठी घर चालू झाले की मस्टर चालू झालं पाहिजे आणि आता २८ हजार रुपये प्रत्येक घरकुलासाठी चालू केले आहे. येणाऱ्या कालखंडामध्ये एकही लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार नाही. २९ लाख लोकांचा सर्वे पूर्ण झाला असून ३० जून पर्यंत सर्वे करण्यास मुदतवाढ मिळाल्यास चांगले काम करू.

केंद्र आणि राज्याने जे उद्दिष्ट निश्चित केले आहे ते उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ग्रामविकास खाते रात्रंदिवस काम करेल. मला सांगायला आनंद होतो आहे की, दुसरा हप्ता पण आम्ही अनेक लोकांना दिला आहे. काही लोकांची घरकुलेही पूर्ण झाली आहेत.

## केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी निधी कमी पडणार नाही

### - मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. अजित पवार



दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रमाप्रसंगी मा.उप मुख्यमंत्री, श्री.अजित पवार यांनी भाषणात सांगितले की, ग्राम विकास आणि पंचायत राज विभागाच्या माध्यमातून विविध ग्रामीण आवास योजना राबविल्या जात आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आपलं हक्काच घर उभे केलेल्या लाभार्थ्यांच्या संघर्षाला, श्रमाला आणि स्वप्नांना सलाम करतो. घरामुळे आज हक्काचा आधारस्तंभ महाराष्ट्रातल्या लाखो कुटुंबीयांना मिळाला आहे.

" सर्वांसाठी घरे" हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली असून आदिवासी आणि ग्रामीण भागतील प्रत्येकाचं स्वतःच्या सुंदर घराचे स्वप्न साकारण्यासाठी देशाचे लाडके पंतप्रधान यांनी तीन कोटी लोकांना घर देण्याचे टार्गेट देशात ठेवले आहे.

महा आवास अभियान पुरस्कार समारोह केवल पुरस्कार तक सिमित नही, बल्की एक ग्राम विकास के क्षेत्र में हमारी सामुहिक सफलता और प्रयासोंका उत्सव है। प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्र को केंद्र सरकार द्वारा २० लाख लक्ष दिया गया, इसके लिये मै माननीय केंद्रीय ग्रामविकास मंत्री श्री शिवराज्य चव्हाण जी का ह्रदयसे आभार व्यक्त करता हूँ।

महा आवास अभियानामध्ये घरकुलांचा दर्जा सुधारण्यासाठी तालुकास्तरावर उभारण्यात आलेल्या डेमो हाऊस मुळे एक सारख्या डिझाईनची घरे उभी झाली आहेत. सर्वसामान्य माणसाला हक्काचा निवारा विक्रमी वेळेमध्ये देण्याचं काम ग्रामविकास विभागा अंतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय करते आहे. याची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांनी होईल, असा विश्वास मी व्यक्त करतो.

देश पातळीवर हे तीन कोटी घरांचे स्वप्न पूर्ण करण्याकरीता महाराष्ट्र राज्य सर्वाधिक चांगलं काम करेल अशा पद्धतीचा संकल्प घेऊन कामाला जोमाने लागले पाहिजे. माझ्याकडे वित्त विभाग असून इथून पुढे केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

## घराला लक्ष्मीचं नाव असल्यामुळे घरे अधिक समृद्ध आणि चांगल्या प्रकारची होईल

**- मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. देवेंद्र फडणवीस**

दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना(ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ या कार्यक्रमाप्रसंगी आपल्या भाषणात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सर्वप्रथम मी आपल्या सर्वांच्या वतीने माननीय शिवराज सिंग चव्हाण साहेबांचे मनापासून आभार मानतो की त्यांनी गेल्या वर्षी वीस लाख आणि आत्ता दहा लाख घरे आपल्या राज्याला दिली.



आपण प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये सहा वर्षांमध्ये १३ लाख घर बांधली आणि सहा महिन्यात ३० लाख घरे आपल्याला मिळाली. मी ग्रामविकास विभागाचं मनापासून अभिनंदन करेल १०० दिवसांच काम ४५ व्या दिवशी याच सभागृहामध्ये वीस लाख घरांना मंजुरी आणि दहा लाख लोकांच्या खात्यात पहिला हप्ता जमा केला. देशातलं पहिलं राज्य हे महाराष्ट्र असेल की ज्याच्यामध्ये ३० लाख घरांसाठी साधारणतः ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ग्रामीण भागामध्ये केली आहे.

केंद्र सरकार जर आपल्याला एवढं देतयं यामध्ये भर घातली पाहिजे आणि म्हणून राज्य सरकारच्या वतीने आम्ही पन्नास हजार रुपये अधिकचे देण्याचा निर्णय घेतला. आमचे वित्तमंत्री दादा घरकुलांकरीता पैसा कमी पडू देणार नसल्यामुळे आज इतक्या मोठ्या प्रमाणात घरांची कामे सुरू आहेत. आज या कार्यक्रमाकरीता पंधरा हजार लोक या ठिकाणी आहात पण लिंक वरून संपूर्ण महाराष्ट्र हा कार्यक्रम पाहतो आहे. आम्ही पंडीत दीनदयाळ उपाध्याय योजने अंतर्गत एक लाख रुपये जमीन खरेदीसाठी निर्णय घेतला आहे. त्यासोबत हाऊसिंग कॉलनी आणि बहुमजली इमारती उभारणीसाठी आपण अनेक जिल्ह्यांना प्रोत्साहित केले असून आज आपण पुरस्कार दिलेल्या अनेक गावांनी वसाहतीप्रमाणे ४०-४० घरांच्या कॉलनी बांधली आहेत.

लोकांनी झोपड्या गावा बाहेर बांधल्यामुळे गावठाणाची हद्दवाढ करून त्यांना त्या ठिकाणी पक्की घरे आणि जमिनीचे पट्टे देण्याचे निर्देश आम्ही दिले आहे. मला या गोष्टीचा आनंद आहे की किमान ७० ते ७५ टक्के घरांमध्ये आमच्या लाडक्या बहिणीचं नाव देखील असल्यामुळे घरे अधिक समृद्ध आणि चांगल्या प्रकारची होईल, त्यामुळे घरामध्ये घराच्या लक्ष्मीचं नाव हे पाहिजे.

## महाराष्ट्र को १ साल कें अंदर ३० लाख मकान देने का सौभाग्य मुझे मिला है

**- मा.केंद्रीय मंत्री,ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान**

दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना(ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ या कार्यक्रमाप्रसंगी आपल्या भाषणात मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले की, आज का दिन सचमुच में ऐतिहासिक दिन है, जो हिंदुस्तान में कभी नहीं हुआ वह आज महाराष्ट्र की धरती पर पुणे में हुआ है। महाराष्ट्र को सबसे ज्यादा संख्या में मकान देने के निश्चिय किया हैं।



आज १० लाख मकान का जो पत्र मैं माननीय मुख्यमंत्री जी को सौपा है, अब एक भी गरीब बिना मकान के बिना नहीं रहेगा। ३० लाख मकान के लिए ५०००० करोड़ मै दूंगा और दादा ने बजट में १५००० करोड़ प्रावधान किया तो ६५००० करोड़ रूपया यह राज्य महाराष्ट्र जो अपने गरीबों का मकान बनाने के लिए एक साल में लग रहा है।

मुझे ग्रामीण विकास मंत्री बने हुए १ साल पूरा नहीं हुआ और ३० लाख मकान देने का सौभाग्य मिल गया, यह भगवान की कृपा है। बताइए १ साल में ६५००० करोड़ रूपया जब ग्रामीण अर्थव्यवस्था में जाएंगे वह ईट खरीदेंगे, वह सीमेंट खरीदेंगे, बाकी चीज खरीदेंगे, कारीगर का काम चलेगा, मजदूरों को रोजगार मिलेगा, पूरी अर्थव्यवस्था चल पडेंगी और महाराष्ट्र को आगे बढ़ाने में सहयोग करेगी।

जीनका नाम २०१८ की सूची से छूट गया था, उन्हे भी मकान चाहिए और इसलिए ईमानदारी से सर्वे हो जाए, मैं आपको विश्वास दिलाता हूं कि महाराष्ट्र में नए सर्वे के बाद मकान देने का काम किया जाएगा। केंद्र सरकार रोटी, कपड़ा, मकान को पूरा करने की उद्देश्य सें लगातार काम कर रही है।

आपको बताना चाहता हूं कि ₹ १०००० महीने से ज्यादा अगर कोई कमाता था, उसको मकान नहीं मिलता था। अब ₹ १५००० महीना भी आमदनी होगी तो अभी मकान दिया जाएगा। टू व्हीलर भी अगर किसी के पास होगा तो उसको भी और ढाई एकड़ तक सिंचित जमीन वाला और पांच एकड़ तक एकड जमीन वाले किसान को भी मकान दिया जाएगा।

# ग्रामीण गृहनिर्माण १०० दिवसीय कृती आराखडा फलश्रुती

"सर्वांसाठी घरे" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने ग्राम विकास व पंचायत राज विभागांतर्गत राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसह पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना व ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत.

राज्यात नवीन सरकारची स्थापना झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गती देण्यासाठी व घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी १०० दिवसीय कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली. त्यानुषंगाने ग्रामीण गृहनिर्माण १०० दिवसीय कृती आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यामध्ये **घरकुलांना मंजूरी, घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण, घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, भूमीहीन लाभार्थ्यांना जागा व महा आवास अभियान राबविणे, इ. उपक्रमांचा समावेश करण्यात आला.**

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गती देण्यासाठी व घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी राबविण्यात आलेल्या १०० दिवसीय कार्यक्रमाची फलश्रुती पुढील प्रमाणे आहे.

१. **घरकुलांना मंजूरी :-** किमान १३ लाख घरकुलांना मंजूरी देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. **या कार्यक्रमांतर्गत ३,६०,०८४** (१०४.६%) घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे.

२. **घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण :-** किमान ३ लाख मंजूर घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता म्हणून एकूण रु.४५० कोटी वितरीत करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. **या कार्यक्रमांतर्गत १२,८०,०७८** (४२६.७%) मंजूर घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता म्हणून एकूण **रु. २०५३.८ कोटी** वितरीत केले आहे.

३. **घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे :-** किमान १ लाख घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. **या कार्यक्रमांतर्गत १,४८,५४२** (१४८.५%) घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण केली आहे.

४. **भूमीहीन लाभार्थ्यांना जागा :-** विविध योजनांच्या माध्यमातून किमान ५००० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. **या कार्यक्रमांतर्गत २३,३३३** (४६६.७%) भूमीहीन लाभार्थ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

५. **महा आवास अभियान राबविणे :- राज्यात दरवर्षी दिनांक २० नोव्हेंबर रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून 'महा आवास अभियान' राबविण्यात येते. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार १०० दिवसीय कार्यक्रमामध्ये 'महा आवास अभियान'** राबविण्याचा उपक्रम समाविष्ट असल्याने सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी महाराष्ट्र राज्यात **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत "महा आवास अभियान २०२४-२५"** राबविण्यात आले.

**"महा आवास अभियान २०२४-२५"** अंतर्गत राज्यात **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी देणे, मंजूर घरकुलांना हप्ते वेळेत वितरित करणे, मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, प्रलंबित घरकुले** (Delayed Houses) **पूर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण**





**पूर्ण करणे, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे, डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे, शासकीय योजनांशी कृतीसंगम** (Convergence) **करणे व नावीन्यपूर्ण उपक्रम** (Innovations / Best Practices) **राबविणे असे १० उपक्रम राबविण्यात आले.**

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणी मध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची '**लॅण्ड बँक**' तयार करणे, वाळू उपलब्धतेसाठी '**सॅण्ड बँक**' ची निर्मिती करणे, घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी '**घरकुल मार्ट**' सुरू करणे, लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्यासाठी आवश्यक सहाय्य करणे, क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इ. साहित्याचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून करणे, घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून '**मॉडेल हाऊसेस**' उभारणी करणे, घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर करणे, घरावर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबींची पूर्तता करणे व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणी करतांना क्षेत्र अधिकारी या ॲपचा वापर करणे, इ. नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

**"महा आवास अभियान २०२४-२५"**च्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यस्तरीय अभियान शुभारंभ कार्यशाळेसह राज्यात **विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांमध्ये अभियाना विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे या कार्यशाळांच्या माध्यमातून अभियान यशस्वीतेसाठी उपाययोजना व नियोजन करण्यात आले.**

ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात आले. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/ युवती, इत्यादींचा समावेश करण्यात आला. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने **"महा आवास अभियान २०२४-२५"** मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले.

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत वेळोवेळी लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले. तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. सारखे उपक्रम राबविणेत आले.

तालुकास्तरावर/ गावोगावी वित्तीय संस्थांच्या अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घरांसाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी वित्तीय संस्था मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात आले.

'महा आवास अभियान २०२४-२५' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचित वापर करण्यात आला.

**"महा आवास अभियान २०२४-२५"** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर समित्या कार्यरत राहतील. या सर्व स्तरावरील अंमलबजावणी,संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे सनियंत्रण व मूल्यमापन करीत आहेत.

अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर **'महा आवास अभियान पुरस्कार २०२४-२५'** देऊन गौरविण्यात येत आहे. **'राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार २०२४-२५'** मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्याचे नियोजित आहे.



# अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार

"सर्वांसाठी घरे" या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा या हेतूने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिना पासून ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" राबविण्यात आले.

मा.केंद्रीय मंत्री,ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत "अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार" वितरण समारंभ दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी बॅडमिंटन हॉल, श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झाला.

यावेळी अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना 'अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' स्वरूप सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

### प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

#### सर्वोत्कृष्ट विभाग

१. प्रथम क्रमांक - विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण
२. द्वितीय क्रमांक - विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
३. तृतीय क्रमांक - विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर

#### सर्वोत्कृष्ट जिल्हे

१.प्रथम क्रमांक-जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहिल्यानगर
२. द्वितीय क्रमांक -जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग
३. तृतीय क्रमांक - जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गोंदिया

#### सर्वोत्कृष्ट तालुके

१. प्रथम क्रमांक -पंचायत समिती, पाथर्डी, जि.अहिल्यानगर
२. द्वितीय क्रमांक -पंचायत समिती, देवगड, जि. सिंधुदुर्ग
३. तृतीय क्रमांक - पंचायत समिती, जावळी, जि. सातारा

#### सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत

१. प्रथम क्रमांक - ग्रा.पं.येळगाव, ता.कराड, जि.सातारा
२. द्वितीय क्रमांक-ग्रा.पं.भूडकेवाडी, ता.पाटण, जि.सातारा
३. तृतीय क्रमांक - ग्रा.पं.चोंढी, ता.मानोरा, जि.वाशिम

#### सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत

१.प्रथम क्रमांक-ग्रा.पं.हनुमंतखेड,ता.धरणगाव,जि.जळगाव
२. द्वितीय क्रमांक-ग्रा.पं.भोसा टा., ता.मोहाडी, जि.भंडारा
३.तृतीय क्रमांक - ग्रा.पं.मोहगव्हाण, ता.मानोरा, जि.वाशिम

#### सर्वोत्कृष्ट गृह संकुल

१.प्रथम क्रमांक-ग्रा.पं.वांगदरी,ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर
२.द्वितीय क्रमांक-ग्रा.पं.गणोरी, ता.फुलंब्री, जि.संभाजीनगर
३.तृतीय क्रमांक-ग्रा.पं.लक्ष्मी दहिवडी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

### राज्य पुरस्कृत आवास योजना

#### सर्वोत्कृष्ट विभाग

१. प्रथम क्रमांक - विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
२. द्वितीय क्रमांक - विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण
३. तृतीय क्रमांक - विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

#### सर्वोत्कृष्ट जिल्हे

१.प्रथम क्रमांक -जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,अहिल्यानगर
२. द्वितीय क्रमांक -जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग
३. तृतीय क्रमांक - जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा

#### सर्वोत्कृष्ट तालुके

१.प्रथम क्रमांक-पंचायत समिती,जामखेड, जि.अहिल्यानगर
२.द्वितीय क्रमांक -पंचायत समिती,आरमोरी, जि.गडचिरोली
३.तृतीय क्रमांक-पंचायत समिती, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

#### सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत

१. प्रथम क्रमांक - ग्रा.पं.बोंद्री, ता.पाटण, जि.सातारा
२. द्वितीय क्रमांक-ग्रा.पं.कारखेडा, ता.मानोरा, जि.वाशिम
३. तृतीय क्रमांक - ग्रा.पं.कुळवंडी, ता.खेड, जि.रत्नागिरी

#### सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत

१. प्रथम क्रमांक - ग्रा.पं.अंतापूर, ता.बागलाण, जि.नाशिक
२.द्वितीय क्रमांक-ग्रा.पं.डोंगरजवळा,ता.गंगाखेड,जि.परभणी
३. तृतीय क्रमांक - ग्रा.पं.शिंद, ता.भोर, जि.पुणे

#### सर्वोत्कृष्ट गृह संकुल

१. प्रथम क्रमांक - ग्रा.पं.नांदगाव, ता.जि. अहिल्यानगर
२.द्वितीय क्रमांक-ग्रा.पं.कुशेर, ता.आंबेगाव, जि.पुणे
३. तृतीय क्रमांक - ग्रा.पं.डोंगरगाव, ता.राजुरा, जि.चंद्रपुर






## देशातील कोणात्याही राज्यापेक्षा महाराष्ट्राला सर्वाधिक ३० लाख घरांचे उद्दिष्ट

दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या आई.सी.ए.आर.-अटारी, पुणे येथील किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी संम्मेलनामध्ये मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त उद्दिष्ट मंजुरीचे पत्र मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांना दिल्यामुळे १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले. त्यामुळे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाआभियान (PM-JANMAN)या दोन्ही केंद्र पुरस्कृत ग्रामीण आवास योजना मिळून २० लाख घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले आहे.

दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी बॅडमिंटन हॉल, श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झालेल्या प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व "अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार" वितरण समारंभ प्रसंगी मा.केंद्रीय मंत्री,ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी १० लक्ष घरांचे अतिरिक्त उद्दिष्ट मंजुरीचे पत्र मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांना दिले.

यामुळे देशातील कोणत्याही राज्यापेक्षा ३० लाख घरकुलांचे ऐतिहासिक उद्दिष्ट सर्वाधिक महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांसाठी मिळाले आहे. सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांसाठी राज्याला मिळालेल्या ३० लाख घरकुलांच्या उद्दिष्टामुळे महाराष्ट्रातील एकही गरीब, गरजु, बेघर व भुमिहीन घरकुलापासून वंचित राहणार नाही. यासाठी महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाचे व मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांचे आभार मानले.



## मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे, मा.मंत्री,श्री.माणिकराव कोकाटे व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १८ में, २०२५ रोजी केंद्रीय कृषी संशोधन परिषदेत, नागपूर येथे ग्राम विकास व कृषी विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला ग्राम विकास व पंचायत राज विभाग व कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी ग्रामविकास विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN), ग्रामसडक योजना, मनरेगा या केंद्रीय योजनांचा आढावा घेण्यात आला.

मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सर्व केंद्रीय योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले.

राज्यात ग्रामविकास विभागा मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध केंद्रीय योजनांच्या प्रगतीबाबत मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय श्री.शिवराज सिंह चौहान यांनी समाधान व्यक्त केले व ग्रामविकास क्षेत्रात राबवित असलेल्या उपक्रमांसाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले.



## दोन दिवसीय ग्राम विकास व पंचायत राज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६ व २७ एप्रिल, २०२५ रोजी या कालावधीत यशदा, पुणे येथे विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप आयुक्त (आस्थापना) व (विकास), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांची ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेला मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, यशदाचे महासंचालक श्री.निरंजन सुधांशू, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्यासह ग्राम विकास व पंचायत राज विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या कार्यशाळेला मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर मंजूर झाल्यावर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी मोहीम स्तरावर काम करावे. तसेच एकही व्यक्ती बेघर राहू नये यासाठी प्रयत्न करुन राज्याला देशातील पहिले बेघरमुक्त राज्य करण्याचे आवाहन मा.मुख्यमंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना केले. प्रशासन लोकाभिमुख आणि गतिशील करण्यासाठी मनुष्यबळाचे योग्य व्यवस्थापन व तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

आतापर्यंत साडेतेरा लाख घरांना मंजुरी आणि १० लाख घरांना पहिला हप्ता देण्यात आला असून त्यापैकी ४६ हजार घरे पूर्ण झाली आहेत. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून ३० लाख घरे उभारण्याचे उद्दिष्ट असून त्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी सांगितले.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते यशदा, पुणे येथे ग्राम विकास व पंचायत राज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळेत विविध उपक्रमांचे उदघाटन, लोकार्पण व प्रकाशन केले.







## ग्रामीण गृहनिर्माण योजना गतिमान करण्यासाठी मा.आमदार यांची जत येथे बैठक

सांगली जिल्ह्यातील जत विधानसभा मतदार संघाचे मा.आमदार श्री.गोपीचंद पडळकर यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियानांतर्गत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक दिनांक ०२ एप्रिल, २०२५ रोजी जत येथे घेण्यात आली.

या बैठकीला जत तालुक्याचे प्रांताधिकारी, तहसिल कार्यालयाचे तहसीलदार, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. आनंद लोकरे, जत तालुक्यांतर्गत ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, घरकुल लाभार्थी व लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मा.आमदार श्री.गोपीचंद पडळकर यांनी महा आवास अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ च्या कामांचा आढावा घेतला. तसेच या योजनेतील सर्व घरकुलांना माहे जून २०२५ अखेर मंजुरी देणे, भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुलासांठी जागेची उपलब्धता करणे, भूमिहीन लाभार्थ्यांचे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी सादर करणे, घरकुल बांधकाम सुरू करणे, लाभार्थ्यांना घरकुलाचे सर्व हप्ते वेळेत त्यांच्या बँक खाती जमा करणे व घरकुलांची कामे जलदगतीने पूर्ण करणे, असे मा.आमदार श्री.गोपीचंद पडळकर यांनी उपस्थितांना सूचित केले.



## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या अध्यक्षतेखाली अकोला येथे बैठक

मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व विकासकामांची आढावा बैठक दिनांक २९ जून, २०२५ रोजी जिल्हा परिषद संविधान सभागृह, अकोला येथे संपन्न झाली.

या बैठकीला अकोला जिल्ह्याचे मा.खासदार, मा.आमदार, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मा. मंत्री महोदयांनी बैठकीच्या सुरूवातीला १०० दिवसांच्या सातकलमी कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संकेतस्थळाचा प्रभावी वापर करणे, ई-ऑफिस प्रणालीचा वापर करतानाच ब्रॉड बँड कनेक्टिव्हिटीचा प्रश्न मार्गी लावणे व ग्रामीण क्षेत्रात काम करतांना क्षेत्रीय भेटींच्या माध्यमातून लोकांना मार्गदर्शन करणे, असे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी उपस्थितांना सुचित केले.

'सर्वांसाठी घरे' हे केंद्र व राज्याचे महत्वाचे धोरण असून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची कामे प्रधान्याने पूर्ण करावयाची आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्र राज्याला सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांमध्ये ३० लक्ष घरांचे विक्रमी उद्दिष्ट केंद्र शासनाने मंजुर केले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी सर्वांनी एकजुटीने सर्वोत्तम कामगिरी करण्याची गरज आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांचे बेघरमुक्त महाराष्ट्र करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची कामे गतीसह गुणवत्तापूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी लाभार्थ्यांना घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून देणे, भुमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करून देणे, सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करणे, घरकुलांची कामे जलदगतीने करणे, शिबिर व सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक गरजूला घरकुल देण्यासाठी सर्व यंत्रणेने सक्रीय सहभाग नोंदवणे, असे निर्देश या बैठकीमध्ये मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी उपस्थितांना दिले.




## राज्यस्तरीय अंमलबाजवणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीची बैठक संपन्न

'अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राज्यस्तरीय पुरस्कार' नामांकने निवड करण्याकरीता राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीची बैठक दिनांक ०२ जून, २०२५ रोजी दूरदृष्य प्रणाली द्वारे संपन्न झाली.

या बैठकीला समितीचे अध्यक्ष तथा मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री.एकनाथ डवले, सदस्य सचिव तथा संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्यासह वित्त विभाग, महसूल व वन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, इ. विभागांचे सर्व मा.अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव समिती सदस्य म्हणून दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापनाबाबत सादरीकरण केले. या मूल्यमापनाच्या आधारे सर्व समिती सदस्यांच्या मंजुरीने राज्यस्तरीय 'अमृत महा आवास अभियान पुरस्कार' उत्कृष्ट कामासाठीची नामांकने अंतिम करण्यात आली.

"अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार" वितरण समारंभ दिनांक ०३ जुन, २०२५ रोजी बॅडमिंटन हॉल, श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्याचे निश्चित केले.



## मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण गृहनिर्माण योजनांची बैठक संपन्न

दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सामाजिक क्षेत्र वॉररूम', मंत्रालय, मुंबई येथे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांची आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे, मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता श्री. गुलाबराव पाटील, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. योगेश कदम, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्रीमती सुजाता सौनिक, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले व मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व इतर मान्यवर उपस्थित होते.

मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून बैठकीत दिलेल्या निर्देशांवर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ अंतर्गत प्रलंबित सर्व घरकुलांचे कामे तात्काळ पूर्ण करणे, २,००० लाभार्थ्यांना आधार कार्ड अभावी घरकुलास मान्यता देण्यास अडचण निर्माण होत असून त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे, वनविभागाच्या जमिनीवर वैयक्तिक अधिग्रहण असल्यास सदर जमीन देता येत नाही परंतु CFR / IFR अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या जमिनीवर घरकुलांचे बांधकाम करता येईल. तसेच प्रदीर्घ कालावधीपासून समुदायाचा अधिवास असलेल्या जागेवर देखील घरकुलांचे बांधकाम करता येईल. आबादीनुसार गायरानांच्या जागा तसेच गावालगतच्या जागांची क्षेत्र वाढवता येईल. तसेच RDA क्षेत्रा व्यतिरिक्त गावाच्या परिसरामध्ये खाजगी ले आउट करावयाचा असल्यास घरकुलांसाठी क्षेत्र सुरक्षित करता येईल. घरकुलांसाठी जागेच्या उपलब्धतेच्या संदर्भात स्वतंत्र बैठक आयोजित करण्याची सुचना मा. मुख्यमंत्री महोदय यांनी केली.




## आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठका

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत माहे एप्रिल ते जून, २०२५ या कालावधीत सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले.

या बैठकांमध्ये मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज यांनी केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांतर्गत अपूर्ण घरकुले व भुमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता या कामांच्या प्रगतीबाबत विभाग व जिल्हानिहाय सविस्तर आढावा घेतला. अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी तात्काळ विशेष मोहीम राबवून अशी घरे CSR व इतर माध्यमातून पूर्ण करणे. सर्व यंत्रणांनी समन्वय साधून लाभार्थ्यांचे **मस्टर्स** वेळेवर निर्गमित करून त्यांची देयके वेळेवर वितरण करणे. **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर आठवड्यात क्षेत्रीय भेटी देवून घरकुल योजनांचा आढावा घेणे**, **अशा** स्पष्ट सूचना मा. प्रधान सचिव यांनी दिल्या.

रेडी रेकनर दर किंवा बाजारभाव काहीही असला तरी लाभार्थ्यांनी रक्कम रु.१०००/- इतके नोंदणी शुल्क भरावयाचे असल्याचे संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच आवास योजनांच्या कामांचे प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी 'आवास मित्र' मॉनिटरींग ॲपचे प्रशिक्षण संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे दिले.



## मा.केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या शुभहस्ते अमृत महा आवास अभियान गौरवगाथा पुस्तिका प्रकाशन व लघुपट प्रदर्शित

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत 'अमृत महा आवास अभियान २०२४-२५' राबविण्यात आले. या अभियाना कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तिंना 'राज्यस्तरीय अमृत महा आवास अभियान २०२२-२३' वितरीत करण्यात आले. यावेळी राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने 'अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' करीता अंतिम निवड केलेल्या संस्था व व्यक्ति यांनी अभियान कालावधीत केलेल्या गौरवपूर्ण कामगिरीची माहिती सांगणारी 'अमृत महा आवास अभियान गौरवगाथा' पुस्तिका राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून प्रकाशित करण्यात आली.

या 'अमृत महा आवास अभियान गौरवगाथा' पुस्तकाचे प्रकाशन मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांच्या शुभहस्ते व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज योगेश कदम, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री.एकनाथ डवले, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत 'अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' वितरण समारंभाप्रसंगी दिनांक ०३ जून, २०२५ रोजी पुणे येथे करण्यात आले.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत उद्दिष्टपूर्तीसाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची माहिती सर्व भागधारकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व राज्यात राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या यशोगाथांच्या जनजागृतीसाठी ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने लघुपटाची निर्मिती केली. या कार्यक्रमाप्रसंगी हा लघुपट प्रदर्शित करण्यात आला.



## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते चित्ररथाचे उद्घाटन

मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते 'संवाद वारी' करीता तयार करण्यात आलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देणाऱ्या चित्र प्रदर्शनाचे, एलइडी व्हॅन कलापथक व्हॅन व चित्ररथाचे उद्घाटन दिनांक २१ जून, २०२५ रोजी विधानभवन, पुणे येथे करण्यात आले.

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज व श्री.संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सोहळ्यासोबत व पालखी मुक्काम तळांसोबत संपूर्ण वारी मार्गावर चित्ररथ, कलापथक तसेच एलइडी व्हॅनच्या माध्यमातून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती करण्यात आली.

या चित्ररथाच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना, व पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना अशा योजनांची माहिती देण्यात आली.



## राज्यस्तरीय कार्यशाळेप्रसंगी मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते महा आवास त्रैमासिक प्रकाशन, आवास ॲप, भूमिलाभ पोर्टल, महा आवास अभियान डॅशबोर्डचे उद्घाटन

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे आणि मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामविकास व पंचायतराज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण-गृहनिर्माण कार्यालयाने तयार केलेल्या आवास ॲप, भूमीलाभ पोर्टल, महा आवास अभियान डॅशबोर्ड, इ.चे उद्घाटन आणि महा आवास त्रैमासिकाचे प्रकाशन दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी यशदा, पुणे येथे करण्यात आले.

याप्रसंगी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, यशदाचे महासंचालक श्री.निरंजन सुधांशू, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्यासह ग्राम विकास व पंचायत राज विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यासोबतच राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, अप्पर आयुक्त, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, इ. अधिकारी उपस्थित होते.

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या संनियंत्रण व मूल्यमापनासाठी 'आवास ॲप' ची निर्मिती केली आहे. लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेच्या उपलब्धतेसाठी 'भुमीलाभ पोर्टल' ची निर्मिती केली आहे. राज्यात दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या महा आवास अभियानातील उपक्रमांची माहिती संग्रहीत करण्यासाठी 'महा आवास अभियान डॅशबोर्ड' ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील घडामोडी व नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या यशोगाथा सर्व भागधारकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'महा आवास त्रैमासिक' प्रकाशित करण्यात येते.





## पुणे विभागस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही योजना देशात दिनांक २० नोव्हेंबर, २०१६ पासून अंमलात आली असून **दरवर्षी दिनांक २० नोव्हेंबर हा 'राष्ट्रीय आवास दिन'** म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी **राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून** राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ या कालावधीत '**महा आवास अभियान २०२३-२४**' राबविण्यात आले.

**मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे आणि विभागीय आयुक्त, पुणे डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या शुभहस्ते 'महा आवास अभियान २०२३-२४'** या अभियान कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तिंना 'विभागस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार' दिनांक २१ जून, २०२५ रोजी विधानभवन, पुणे येथे वितरीत करण्यात आले. यावेळी पुरस्कार विजेत्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.





## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या सहकार्यासाठी रोटरी क्लब सोबत सामंजस्य करार

मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रोटरी क्लब बिबवेवाडी, पुणे यांच्या सीएसआर निधीच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) या आवास योजनांसाठी सहकार्य करण्यासंदर्भात सामंजस्य करार दिनांक २१ जून, २०२५ रोजी विधानभवन, पुणे येथे करण्यात आला.

याप्रसंगी मा.मंत्री, महोदयांसह विभागीय आयुक्त, पुणे श्री.चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, रोटरी क्लब बिबवेवाडी, पुणे यांचे अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना ग्राम विकास व पंचायत राज विभागा मार्फत राबविण्यात येतात. राज्यात ३० लक्ष घरकुल बांधकामाचे उद्दिष्ट्य दिले असून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी रोटरी क्लब बिबवेवाडी, पुणे यांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांनी यावेळी सांगितले.



## मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली PM-JANMAN च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वय बैठक संपन्न

मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री.शैलेश कुमार सिंह यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिनांक १६ मे, २०२५ रोजी सकाळी ११ वा. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्रिपुरा, छत्तीसगड, गुजरात, झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, तामिळनाडू, उत्तराखंड, कर्नाटक, केरळ, उत्तर प्रदेश, बिहार, तेलंगणा, मणिपूर आणि आंध्र प्रदेश या राज्यांची समन्वय बैठक घेण्यात आली.

या बैठकीला महाराष्ट्र राज्यातून मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले, संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्यासह ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये पात्र PVTG कुटुंबांची ओळख पटविण्यासाठी सुरू असलेल्या सर्वेक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. सर्वेक्षण पूर्ण करण्याची वेळ आधीच संपली असून याबाबत आवश्यक कार्यवाही तात्काळ करणे. सर्व पात्र PVTG कुटुंबांच्या घरकुलांना दिनांक १५ मे, २०२५ रोजी पर्यंत मंजुरी देण्याचे सूचित केले होते. तसेच दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी पर्यंत प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत सर्व राज्यांनी घरे पूर्ण करावयाची असल्याने त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी. याकरीता आवश्यक निधीची मागणी केंद्र शासनाकडे विनाविलंब करावी. असे मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री.शैलेश कुमार सिंह यांनी बैठकीत सर्व राज्यांना सूचित केले.

महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत घरकुलांची कामे प्रगतीत असून उर्वरीत सर्व घरकुलांची कामे मुदतीत पूर्ण करणार असल्याचे मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी बैठकीत सांगितले.



## भुमिहीनांना जागेसाठी पुणे विभागीय कृती दल (Task Force) समितीची बैठक

विभागीय कृती दल (Task Force) समिती अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, पुणे डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे अध्यक्षतेखाली विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी विभागीय कृतीदल (Task Force) समितीची बैठक दिनांक १७ मे, २०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे सकाळी १०.०० वा. संपन्न झाली.

या बैठकीला समितीचे सदस्य तथा जिल्हाधिकारी, पुणे डॉ. जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. कुमार आर्शिवाद, जिल्हाधिकारी, सांगली श्री. अशोक काकडे, जिल्हाधिकारी, सातारा श्री. संतोष पाटोल, जिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री अमोल येडगे, जिल्हा परिषद, सांगली मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती तृप्ती घोडमिसे, जिल्हा परिषद, सोलापूर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुदिप जंगम, जिल्हा परिषद, पुणे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजाजन पाटील, जिल्हा परिषद, कोल्हापूर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संतोष जोशी, जिल्हा परिषद, सातारा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विश्वास सिद, सदस्य सचिव तथा अप्पर आयुक्त (विकास) श्री. विजय मुळीक यांच्यासह पुणे विभागातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्राक नियंत्रक, अप्पर कामगार आयुक्त, एकात्मिक आदिवासी विकास कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी इ. अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या बैठकीच्या सुरुवातीला अप्पर आयुक्त (विकास), पुणे विभाग यानी सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेसाठी थोडक्यात माहिती दिली. तसेच भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेच्या सद्यःस्थितीचे जिल्हानिहाय सादरीकरण करून आढावा घेण्यात आला.

यामध्ये पुणे विभागात शिल्लक भूमिहीन लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्याने त्याकरीता गाव पातळीवर लाभार्थी निहाय आढावा घेणे. गायरान जागेतील प्रस्तावावावत शासन निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे. गावठाणातील अतिक्रमणे नियमित करणे. शासन जमिनीवरील अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाच्या संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करणे. जागांच्या अडचणीवर मात करणेसाठी बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट उभारणी असे उपक्रम राबविणे. पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणे. राज्यस्तरीय कृतीदल समितीच्या सूचनानुसार कार्यवाही करणे. असे निर्देश अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, पुणे डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.



## मा.आमदार यांच्या अध्यक्षतेखाली जागा उपलब्धतेसाठी समन्वय बैठक संपन्न

दिनांक २८ जून, २०२५ रोजी मा.आमदार श्री.विलास बाप्पु भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली व छत्रपती संभाजी नगर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.अशोक शिरसे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचायत समिती सभागृहात, पैठण येथे भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गायरान, गावठाण क्षेत्रात जागा उपलब्ध करून देण्यासाठी महसूल व ग्रामविकास यंत्रणेची समन्वय बैठक घेण्यात आली.

या बैठकीला पैठणचे तहसीलदार श्री.दिनेश झांपले, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.शिवाजी साळुंके, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री.राजेश कांबळे, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) श्री.बी.डी. राठोड, श्री.आर. डी. चौधरी यांच्यासह तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेसाठी शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



## लोकप्रतिनिधी व शासकीय यंत्रणेच्या समन्वयातून लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये घरकुल बांधकामात गती येण्यासाठी लोकप्रतिनिधी व शासकीय यंत्रणेच्या समन्वयातून लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी मोफत वाळूची उपलब्धता करण्यात येत असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दिनांक २४ मे, २०२५ रोजी घरकुल मंजूर लाभार्थ्यांना रेती वितरण मोहिमेचा शुभारंभ मा.आमदार श्री.देवरावदादा भोंगळे यांच्या शुभहस्ते राजुरा तालुक्यातील ग्रामपंचायत सातरी येथील रेती घाटावर संपन्न झाला. याप्रसंगी प्रांत अधिकारी श्री. माने, तहसीलदार श्री. गोंड, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, लोकप्रतिनिधी, घरकुल मंजूर लाभार्थी, महसूल व ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तसेच चिमूर तालुक्यातील विविध घरकुल योजनांच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांकरिता विनामूल्य वाळू उपलब्ध करून देण्याकरिता उमा नदीवरील पिपर्डा व खातोडा तसेच गोदणी नदीवरील बोडधा व सिरपूर येथील रेती घाट निश्चित करण्यात आले आहे. चिमूर तालुक्यातील विविध घरकुल योजनांच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या चारही रेती घाटामधून रेतीचे विनामूल्य वाटप करण्यात आले.

दिनांक २६ मे, २०२५ रोजी चिमूर मतदार संघाचे मा.आमदार श्री.किर्तीकुमार भांगडिया व चंद्रपुर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पिपर्डा घाटातून लाभार्थांना घरकुल बांधकामासाठी विनामूल्य वाळूची उपलब्ध करून देण्यात येत आहे.

याप्रसंगी पिपर्डा घाटावर चिमुरचे उपविभागीय अधिकारी श्री.किशोर घाडगे, तहसिलदार श्री.श्रीधर राजमाने, मंडळ अधिकारी श्री.चिडे, तलाठी श्री.शुभम बदकी, श्री.स्वप्निल उमरे, श्री.केतन घरकेले, श्री.अंकित नंदुरकर त्यासोबतच पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, घरकुल लाभार्थी व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





## PM-JANMAN च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्रीय अधिकाऱ्याचा रायगड दौरा

महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान या केंद्र पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून गरिब, गरजू, बेघर व भुमिहीन लाभार्थ्यांच्या हक्काच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान या योजनेंतर्गत राज्यात सुरू असलेल्या कामांची माहिती घेण्याकरीता दिनांक ०९ मे, २०२५ रोजी प्रकल्प अधिकारी (ICT & MIS), जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार डॉ. हर्षिता भटनागर यांनी रायगड जिल्ह्याचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यात प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान या ययोजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. तसेच गावपातळीवर क्षेत्रीय भेटी देवून पूर्ण व कामे प्रगतीत असलेल्या घरकुलांची पाहणी व लाभार्थ्यांना मार्गदर्श केले.

यावेळी पेण एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे सहायक प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्विनी गलांडे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ICDS), जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, अलिबाग पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर श्रीमती जागृती पोवळे, इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ (सन २०२४-२५ ते सन २०२८-२९) अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्श्यातून रु. ५०,०००/- इतकी अतिरिक्त वाढ करण्याबाबत.

"सर्वांसाठी घरे" हे केंद्र शासनाचे धोरणानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात. राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान योजना राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर विविध प्रवर्गाकरीता राज्य पुरस्कृत आवास योजना राबविण्यात येत असून त्यात प्रामुख्याने 'अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांकरीता 'रमाई आवास योजना', 'अनुसूचित जमाती' करीता 'शबरी आवास योजना', 'पारधी आवास योजना' व 'आदिम आवास योजना' तसेच 'विमुक्त जाती व भटक्या जमाती' करीता 'यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना', 'इतर मागास वर्ग' प्रवर्गासाठी 'मोदी आवास घरकुल योजना' इत्यादींचा समावेश आहे. वरील सर्व योजनांची अंमलबजावणी ग्राम विकास विभागांतर्गत स्थापित राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयामार्फत करण्यात येते.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, टप्पा-१ सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीमध्ये राज्यात राबविण्यात आला. आता केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी सुरु केला असून त्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनाला १९.६६ लाख घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाचा खर्च जास्त येत असल्यामुळे या योजनांतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

वरील बाबी विचारात घेता, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत टप्पा-२ मध्ये लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ व अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२५/प्र.क्र.०४/योजना-१०, दिनांक ४ एप्रिल, २०२५ नुसार अनुदान वाढीचा निर्णय घेतला आहे.

**-ः शासन निर्णयः-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि लाभार्थ्यांना अधिक अर्थसहाय्य करण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्यपुरस्कृत ग्रामीण घरकुल योजने अंतर्गत, सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्श्यातून रु. ५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या रु. ५०,०००/- रक्कमेमधून रु. ३५,०००/- अनुदान हे घरकुल बांधकामासाठी तर, रु.१५,०००/- इतके अनुदान हे प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर 1 KW मर्यादेपर्यंत सौर उर्जा यंत्रणा उभारणी करिता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील. जे लाभार्थी सौर उर्जा यंत्रणा उभारणी करणार नाहीत त्यांना सदरील रु. १५,०००/- अनुदान देय असणार नाही.

(२) राज्यात, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचेकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मंजूर उद्दिष्टांकरीता असलेले दायीत्व पूर्ण करुन यापुढे नव्याने वेगळे उद्दिष्ट न देता, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ ते २०२८-२९ मध्ये प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टांसाठी आवश्यक निधी संबंधित प्रशासकीय विभागाच्या अर्थसंकल्पात तरतूद करुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांना उपलब्ध करुन देण्यात यावा

२. उक्त नमुद बाबी व्यतिरिक्त संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १४.१०.२०१६ यामध्ये नमूद केलेल्या इतर सर्व बाबी कायम राहतील.

३. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ हा कार्यक्रम/योजना राबविल्यामुळे, राज्यात शाश्वत विकास ध्येय क्र.०१ चे लक्ष्य क्र.१.१ हे सन २०३० पर्यंत साध्य करण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड | ९,५८५ | ९,५८५ | ९,५५४ | ९९.६८ | १ | १०२ |
| २ | सिंधुदुर्ग | ५,००८ | ५,००८ | ४,९८९ | ९९.६२ | २ | ५९ |
| ३ | रत्नागिरी | ९,६१२ | ९,६१२ | ९,५७३ | ९९.५९ | ३ | ७६ |
| ४ | पालघर | ३५,०८२ | ३५,०८२ | ३४,६४१ | ९८.७४ | ५ | १४२ |
| ५ | ठाणे | ९,४७३ | ९,४७३ | ९,२९२ | ९८.०९ | ८ | १५६ |
| **कोकण विभाग** | | **६८,७६०** | **६८,७६०** | **६८,०४९** | **९८.९७** | **१** | |
| ६ | गोंदिया | ९५,१५५ | ९५,१५५ | ९४,२६२ | ९९.०६ | ४ | १५७ |
| ७ | गडचिरोली | ३१,४८२ | ३१,४८२ | ३०,१८५ | ९५.८८ | १० | २०० |
| ८ | वर्धा | १७,३६६ | १७,३६६ | १६,६५० | ९५.८८ | ११ | ९२ |
| ९ | भंडारा | ६३,३८० | ६३,३८० | ६०,५०६ | ९५.४७ | १४ | २५३ |
| १० | चंद्रपूर | ४१,८५५ | ४१,८५५ | ३९,३३३ | ९३.९७ | १७ | १५१ |
| ११ | नागपूर | ३५,५८६ | ३५,५८६ | ३३,३३१ | ९३.६६ | १८ | ३२७ |
| **नागपूर विभाग** | | **२,८४,८२४** | **२,८४,८२४** | **२,७४,२६७** | **९६.२९** | **२** | |
| १२ | नाशिक | ८८,७९७ | ८८,७९७ | ८५,२२१ | ९५.९७ | ९ | १८० |
| १३ | नंदुरबार | १,१८,२७६ | १,१८,२७६ | १,१३,०३६ | ९५.५७ | १३ | ३७६ |
| १४ | अहिल्यानगर | ५८,८१७ | ५८,८१७ | ५५,५७० | ९४.४८ | १६ | १३७ |
| १५ | धुळे | ६४,५७६ | ६४,५७६ | ६०,३६२ | ९३.४७ | १९ | ३१२ |
| १६ | जळगाव | ७६,८१९ | ७६,८१९ | ६८,२७७ | ८८.८८ | ३३ | ५११ |
| **नाशिक विभाग** | | **४,०७,२८५** | **४,०७,२८५** | **३,८२,४६६** | **९३.९१** | **३** | |
| १७ | सातारा | १४,२६० | १४,२६० | १४,००० | ९८.१८ | ७ | १३ |
| १८ | कोल्हापूर | १६,२२४ | १६,२२४ | १५,५२५ | ९५.६९ | १२ | १२७ |
| १९ | सांगली | २०,४२१ | २०,४२१ | १८,८६९ | ९२.४० | २२ | ४८९ |
| २० | सोलापूर | ४३,९६१ | ४३,९६१ | ४०,२४४ | ९१.५४ | २७ | २९५ |
| २१ | पुणे | १८,५७३ | १८,५७३ | १६,८१२ | ९०.५२ | ३० | ४३३ |
| **पुणे विभाग** | | **१,१३,४३९** | **१,१३,४३९** | **१,०५,४५०** | **९२.९६** | **४** | |
| २२ | वाशिम | १८,२४४ | १८,२४४ | १७,९२० | ९८.२२ | ६ | ५१ |
| २३ | अकोला | ४६,४३९ | ४६,४३९ | ४४,०१५ | ९४.७८ | १५ | ३७४ |
| २४ | अमरावती | ८७,२१७ | ८७,२१७ | ८०,८५३ | ९२.७० | २१ | ५०३ |
| २५ | यवतमाळ | ६२,६८७ | ६२,६८७ | ५७,६६० | ९१.९८ | २५ | १४८ |
| २६ | बुलढाणा | ३९,६११ | ३९,६११ | ३४,७३६ | ८७.६९ | ३४ | ४९३ |
| **अमरावती विभाग** | | **२,५४,१९८** | **२,५४,१९८** | **२,३५,१८४** | **९२.५२** | **५** | |
| २७ | हिंगोली | १६,८६६ | १६,८६६ | १५,७४० | ९३.३२ | २० | ९१ |
| २८ | धाराशिव | १२,८४० | १२,८४० | ११,८३९ | ९२.२० | २३ | ३६९ |
| २९ | जालना | २३,०६३ | २३,०६३ | २१,२३८ | ९२.०९ | २४ | ३०७ |
| ३० | बीड | ३४,२२३ | ३४,२२३ | ३१,३८१ | ९१.७० | २६ | ३८५ |
| ३१ | परभणी | १८,५४२ | १८,५४२ | १६,८५९ | ९०.९२ | २८ | १२४ |
| ३२ | छत्रपती संभाजी नगर | ३४,९५९ | ३४,९५९ | ३१,६४९ | ९०.५३ | २९ | २७२ |
| ३३ | लातूर | १८,९३३ | १८,९३३ | १७,१०३ | ९०.३३ | ३१ | ४१२ |
| ३४ | नांदेड | ६८,२९६ | ६८,२९६ | ६०,९२९ | ८९.२१ | ३२ | ५३३ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **२,२७,७२२** | **२,२७,७२२** | **२,०६,७३८** | **९०.७९** | **६** | |
| **एकूण** | | १३,५६,२२८ | १३,५६,२२८ | १२,७२,१५४ | **९३.८०** | | |

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ६०,६८४ | ६०,६७६ | ५,३२४ | ९९.९९ | १ |
| २ | रायगड | १६,३४६ | १६,३०४ | ३७० | ९९.७४ | २ |
| ३ | रत्नागिरी | १९,७४४ | १९,६०१ | ४३४ | ९९.२८ | ४ |
| ४ | ठाणे | १९,२८७ | १९,१४५ | ७७१ | ९९.२६ | ५ |
| ५ | सिंधुदुर्ग | ११,९९१ | ११,८०३ | ४२८ | ९८.४३ | ८ |
| | कोकण विभाग | १२८०५२ | १२७५२९ | ७३२७ | ९९.५९ | १ |
| ६ | गोंदिया | ६७,३४८ | ६६,७१८ | ६,४१८ | ९९.०६ | ६ |
| ७ | भंडारा | ५६,६१० | ५५,२३६ | ७८६ | ९७.५७ | ९ |
| ८ | नागपूर | २२,०७० | २१,३२८ | १,२२७ | ९६.६४ | १० |
| ९ | गडचिरोली | ४८,६५९ | ४६,७५३ | ५,९०१ | ९६.०८ | ११ |
| १० | वर्धा | २२,९६० | २१,५१२ | २,०२७ | ९३.६९ | १७ |
| ११ | चंद्रपूर | ६२,८०१ | ५४,२७९ | २,७४७ | ८६.४३ | २८ |
| | नागपूर विभाग | २८०४४८ | २६५८२६ | १९१०६ | ९४.७९ | २ |
| १२ | अहिल्यानगर | १,२९,०८५ | १,२७,१५० | २,९२६ | ९८.५० | ७ |
| १३ | नंदुरबार | १,४०,५६३ | १,३३,३१४ | २,२६४ | ९४.८४ | १४ |
| १४ | नाशिक | १,६६,३७५ | १,५६,७४८ | ८,३६० | ९४.२१ | १६ |
| १५ | धुळे | १,१६,९१८ | १,०९,४४१ | १,६६२ | ९३.६० | १८ |
| १६ | जळगाव | १,४१,९६४ | १,२५,६१५ | २,८८८ | ८८.४८ | २४ |
| | नाशिक विभाग | ६९४९०५ | ६५२२६८ | १८१०० | ९३.८६ | ३ |
| १७ | वाशिम | ७०,७०० | ७०,२४३ | १,४४४ | ९९.३५ | ३ |
| १८ | अकोला | ४१,०३५ | ३९,०११ | ४,७८४ | ९५.०७ | १३ |
| १९ | यवतमाळ | १,८७,९२८ | १,७१,७०४ | ४,०७८ | ९१.३७ | २१ |
| २० | बुलढाणा | १,१३,८८० | ९८,००१ | ६३२ | ८६.०६ | २९ |
| २१ | अमरावती | ७४,१७३ | ६१,३०९ | ३,८६२ | ८२.६६ | ३१ |
| | अमरावती विभाग | ४८७७१६ | ४४०२६८ | १४८०० | ९०.२७ | ४ |
| २२ | सातारा | ४५,४४९ | ४३,५७७ | १,०४२ | ९५.८८ | १२ |
| २३ | पुणे | ४०,९०८ | ३८,०२० | ९६० | ९२.९४ | १९ |
| २४ | कोल्हापूर | ५७,६३३ | ५२,९९९ | ६९२ | ९१.९६ | २० |
| २५ | सोलापूर | १,१३,७०७ | ९८,४२३ | ९०३ | ८६.५६ | २७ |
| २६ | सांगली | ४९,७२५ | ४२,७७८ | ८४५ | ८६.०३ | ३० |
| | पुणे विभाग | ३०७४२२ | २७५७९७ | ४४४२ | ८९.७१ | ५ |
| २७ | छत्रपती संभाजी नगर | १,३१,८०६ | १,२४,३६३ | ३,१२५ | ९४.३५ | १५ |
| २८ | लातूर | ७६,८६३ | ६८,६५३ | ८९२ | ८९.३२ | २२ |
| २९ | बीड | १,७३,७१८ | १,५४,१८५ | ५,८५६ | ८८.७६ | २३ |
| ३० | धाराशिव | ७१,४३४ | ६२,८९९ | ८५८ | ८८.०५ | २५ |
| ३१ | हिंगोली | ८३,१२९ | ७२,१५२ | २,०३३ | ८६.८० | २६ |
| ३२ | नांदेड | २,४२,६९३ | १,९९,७४४ | २,५८७ | ८२.३० | ३२ |
| ३३ | जालना | १,३६,०३५ | १,०९,६१८ | २,२२८ | ८०.५८ | ३३ |
| ३४ | परभणी | १,३०,७८५ | १,०४,८३६ | १,७९१ | ८०.१६ | ३४ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | १०४६४६३ | ८९६४५० | १९३७० | ८५.६६ | ६ |
| | एकूण | २९४५००६ | २६५८१३८ | ८३१४५ | ९०.२६ | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ७,०७५ | ६,८५४ | ६,३०९ | ९२.०५ | १ |
| २ | सिंधुदुर्ग | २,३२९ | २,३२२ | २,०९२ | ९०.०९ | २ |
| ३ | रायगड | २,९१४ | २,६३१ | २,०८२ | ७९.१३ | १३ |
| ४ | पालघर | ६९८ | ६६३ | ४६४ | ६९.९८ | २६ |
| ५ | ठाणे | १,८२६ | १,८२६ | १,२४९ | ६८.४० | ३१ |
| | कोकण विभाग | १४,८४२ | १४,२९६ | १२,१९६ | ८५.३१ | १ |
| ६ | अहिल्यानगर | ३३,२५४ | ३२,२६७ | २८,५०० | ८८.३३ | ५ |
| ७ | नाशिक | २८,६४९ | १५,५१४ | १२,३२३ | ७९.४३ | ११ |
| ८ | जळगाव | २३,२६९ | २१,५६९ | १७,०९३ | ७९.२५ | १२ |
| ९ | नंदुरबार | ४,७८२ | ३,७९० | २,९४७ | ७७.७६ | १७ |
| १० | धुळे | १४,७७६ | ११,६७९ | ८,०५७ | ६८.९९ | २९ |
| | नाशिक विभाग | १,०४,७३० | ८४,८१९ | ६८,९२० | ८१.२६ | २ |
| ११ | सातारा | १२,१०८ | १२,१०४ | १०,७१३ | ८८.५१ | ३ |
| १२ | सांगली | १०,६६४ | १०,१७१ | ८,२९७ | ८१.५८ | ८ |
| १३ | पुणे | ११,४१९ | ११,१९६ | ८,९४८ | ७९.९२ | १० |
| १४ | कोल्हापूर | १७,०३६ | १६,९९२ | १३,३२१ | ७८.४० | १४ |
| १५ | सोलापूर | २५,०९० | २२,०३० | १७,२२२ | ७८.१८ | १५ |
| | पुणे विभाग | ७६,३१७ | ७२,४९३ | ५८,५०१ | ८०.७० | ३ |
| १६ | वर्धा | ९,५६९ | ८,५६८ | ७,५८२ | ८८.४९ | ४ |
| १७ | गोंदिया | १४,४७९ | १३,८०५ | ११,४६७ | ८३.०६ | ७ |
| १८ | गडचिरोली | ८,८८० | ८,१४७ | ६,६४१ | ८१.५१ | ९ |
| १९ | चंद्रपूर | २६,४२७ | २३,२८९ | १७,९६० | ७७.१२ | १८ |
| २० | भंडारा | १५,३९० | १४,२१० | १०,५९९ | ७४.५९ | २१ |
| २१ | नागपूर | २०,५४० | १३,४४५ | १०,०२१ | ७४.५३ | २२ |
| | नागपूर विभाग | ९५,२८५ | ८१,४६४ | ६४,२७० | ७८.८९ | ४ |
| २२ | वाशिम | ३१,८४७ | १२,७४० | १०,७२५ | ८४.१८ | ६ |
| २३ | अकोला | २९,५९२ | २८,९०१ | २२,४९१ | ७७.८२ | १६ |
| २४ | यवतमाळ | २४,२८२ | २०,१०२ | १५,३४५ | ७६.३४ | १९ |
| २५ | अमरावती | २३,४५९ | २३,००५ | १६,०९७ | ६९.९७ | २७ |
| २६ | बुलढाणा | २८,६७९ | २६,९६२ | १७,८८४ | ६६.३३ | ३२ |
| | अमरावती विभाग | १,३७,८५९ | १,११,७१० | ८२,५४२ | ७३.८९ | ५ |
| २७ | छत्रपती संभाजी नगर | ३५,९८७ | २८,६२२ | २१,४९४ | ७५.१० | २० |
| २८ | बीड | ३६,७३५ | ३२,००४ | २३,७३२ | ७४.१५ | २३ |
| २९ | धाराशिव | २२,५१७ | १९,४०६ | १४,२७० | ७३.५३ | २४ |
| ३० | लातूर | ३९,०४४ | ३७,०८३ | २६,९५१ | ७२.६८ | २५ |
| ३१ | परभणी | २८,३३१ | २३,७९७ | १६,६३२ | ६९.८९ | २८ |
| ३२ | नांदेड | ३३,६०० | २६,५११ | १८,२७६ | ६८.९४ | ३० |
| ३३ | हिंगोली | २२,८६६ | १९,१८७ | १२,५४७ | ६५.३९ | ३३ |
| ३४ | जालना | ४२,५७७ | ३३,०३७ | १८,६९५ | ५६.५९ | ३४ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | २,६१,६५७ | २,१९,६४७ | १,५२,५९७ | ६९.४७ | ६ |
| | एकूण | ६,९०,६९० | ५,८४,४२९ | ४,३९,०२६ | ७५.१२ | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २९ | १०० | ३ |
| २ | रत्नागिरी | ३४० | २५४ | २५३ | ९९.६१ | ४ |
| ३ | पालघर | १४,३८५ | १४,३५२ | १३,०२३ | ९०.७४ | ५ |
| ४ | रायगड | ६,६१० | ६,४७३ | ५,५५२ | ८५.७७ | १० |
| ५ | ठाणे | ५,४३० | ५,४११ | ३,५६३ | ६५.८५ | २३ |
| कोकण विभाग | | २६,८०८ | २६,५१९ | २२,४२० | ८४.५४ | १ |
| ६ | कोल्हापूर | ६० | २५ | २५ | १०० | १ |
| ७ | सातारा | १९७ | १९२ | १९२ | १०० | २ |
| ८ | सोलापूर | ८९४ | ६९० | ६२४ | ९०.४३ | ६ |
| ९ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.०० | ९ |
| १० | पुणे | ६,७३६ | ६,४१९ | ४,७१५ | ७३.४५ | १७ |
| पुणे विभाग | | ७,९६७ | ७,३७६ | ५,५९९ | ७५.९१ | २ |
| ११ | गोंदिया | ५,५९९ | ५,५७५ | ५,०२७ | ९०.१७ | ७ |
| १२ | वर्धा | ६,६९२ | ५,६९१ | ४,६३५ | ८१.४४ | ११ |
| १३ | गडचिरोली | १०,९५१ | १०,६५० | ८,५७६ | ८०.५३ | १३ |
| १४ | भंडारा | ६,३३६ | ६,३०२ | ४,९५० | ७८.५५ | १४ |
| १५ | चंद्रपूर | २४,४३२ | २१,५४९ | १३,८५२ | ६४.२८ | २५ |
| १६ | नागपूर | १३,१८८ | ११,९५५ | ७,०९८ | ५९.३७ | २९ |
| नागपूर विभाग | | ६७,१९८ | ६१,७२२ | ४४,१३८ | ७१.५१ | ३ |
| १७ | अकोला | ५,८१५ | ५,२९२ | ४,१३४ | ७८.१२ | १५ |
| १८ | वाशिम | ३,४७० | २,८२४ | २,०९६ | ७४.२२ | १६ |
| १९ | अमरावती | १५,२३५ | १५,२०८ | १०,०७५ | ६६.२५ | २२ |
| २० | यवतमाळ | १४,३२४ | १४,३०५ | ९,४१२ | ६५.८० | २४ |
| २१ | बुलढाणा | ४,१९१ | ३,२३१ | १,८०७ | ५५.९३ | ३१ |
| अमरावती विभाग | | ४३,०३५ | ४०,८६० | २७,५२४ | ६७.३६ | ४ |
| २२ | अहिल्यानगर | ९,१५७ | ९,११३ | ७,४०४ | ८१.२५ | १२ |
| २३ | जळगाव | १४,६३२ | १४,५२१ | १०,३२४ | ७१.१० | १८ |
| २४ | नाशिक | ३६,५१६ | ३२,६०७ | २२,२३४ | ६८.१९ | २० |
| २५ | नंदुरबार | ४७,०४६ | २२,५८५ | १३,१४५ | ५८.२० | ३० |
| २६ | धुळे | २७,४८५ | २२,७६४ | ११,८४२ | ५२.०२ | ३२ |
| नाशिक विभाग | | १,३४,८३६ | १,०१,५९० | ६४,९४९ | ६३.९३ | ५ |
| २७ | लातूर | १,५३८ | ६४० | ५६० | ८७.५० | ८ |
| २८ | धाराशिव | ५४९ | ४८४ | ३४१ | ७०.४५ | १९ |
| २९ | छत्रपती संभाजी नगर | ७,७८७ | ६,४०४ | ४,३२५ | ६७.५४ | २१ |
| ३० | बीड | २,२३० | १,३२३ | ८२८ | ६२.५९ | २६ |
| ३१ | हिंगोली | १८,०३६ | १४,७०७ | ९,१९० | ६२.४९ | २७ |
| ३२ | जालना | २,९५६ | १,५०५ | ९१६ | ६०.८६ | २८ |
| ३३ | परभणी | ३,८८७ | ३,२४८ | १,५५१ | ४७.७५ | ३३ |
| ३४ | नांदेड | ८,१४१ | ४,१६० | १,८०२ | ४३.३२ | ३४ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४५,१२४ | ३२,४७१ | १९,५१३ | ६०.०९ | ६ |
| एकूण | | ३,२४,९६८ | २,७०,५३८ | १,८४,१४३ | ६८.०७ | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४२१ | ९७.४५ | ९ |
| २ | जळगाव | ५७० | ५६९ | ५४२ | ९५.२५ | १४ |
| ३ | अहिल्यानगर | १९८ | १९८ | १८४ | ९२.९३ | १८ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | १२० | ८७.५९ | २२ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०० | २९ |
| | नाशिक विभाग | १,३५३ | १,३३६ | १,२६७ | ९४.८४ | १ |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६४ | १०० | ८ |
| ७ | अकोला | ३७३ | ३७३ | ३६२ | ९७.०५ | १० |
| ८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५८ | ९६.५० | १२ |
| ९ | अमरावती | ४४४ | ४४४ | ४२० | ९४.५९ | १५ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९४ | ५२१ | ८७.७१ | २१ |
| | अमरावती विभाग | १,८४६ | १,८४६ | १,७२५ | ९३.४५ | २ |
| ११ | वर्धा | ५० | ५० | ५० | १०० | ७ |
| १२ | नागपूर | ४८ | ४८ | ४६ | ९५.८३ | १३ |
| १३ | चंद्रपूर | ३५ | ३२ | २३ | ७१.८८ | २५ |
| | नागपूर विभाग | १३३ | १३० | ११९ | ९१.५४ | ३ |
| १४ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १०० | १ |
| १५ | लातूर | १७ | १७ | १७ | १०० | ३ |
| १६ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १०० | ४ |
| १७ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १०० | ५ |
| १८ | जालना | ३८ | ३६ | ३४ | ९४.४४ | १६ |
| १९ | बीड | ९२ | ८३ | ७८ | ९३.९८ | १७ |
| २० | छत्रपती संभाजी नगर | ५७ | ५१ | ४६ | ९०.२० | १९ |
| २१ | धाराशिव | २४७ | २४७ | २१० | ८५.०२ | २३ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | ५९२ | ५६७ | ५१८ | ९१.३६ | ४ |
| २२ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १०० | २ |
| २३ | सातारा | २४ | २४ | २४ | १०० | ६ |
| २४ | सोलापूर | २३१ | २०२ | १९६ | ९७.०३ | ११ |
| २५ | सांगली | ३८ | २६ | २३ | ८८.४६ | २० |
| २६ | पुणे | १८८ | १७४ | १४० | ८०.४६ | २४ |
| | पुणे विभाग | ४८८ | ४३३ | ३९० | ९०.०७ | ५ |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.०० | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०० | ३२ |
| | कोकण विभाग | ३ | ० | ० | ०.०० | ६ |
| | एकूण | ४,४१५ | ४,३१२ | ४,०१९ | ९३.२१ | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १०० | १ |
| २ | पालघर | १,१३१ | १,१२८ | १,१०४ | ९७.८७ | २ |
| ३ | रायगड | १,३९४ | १,३९१ | १,३४९ | ९६.९८ | ३ |
| ४ | ठाणे | १,५७८ | १,५७५ | १,५१६ | ९६.२५ | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | १० | ९०.९१ | ६ |
| कोकण विभाग | | ४,१८० | ४,१५५ | ४,०२९ | ९६.९७ | १ |
| ६ | गडचिरोली | १,७७८ | १,७५२ | १,६३५ | ९३.३२ | ५ |
| ७ | चंद्रपूर | ७२३ | ६६६ | ५६८ | ८५.२९ | ७ |
| ८ | वर्धा | ३९६ | ३९६ | २९२ | ७३.७४ | १० |
| नागपूर विभाग | | २,८९७ | २,८१४ | २,४९५ | ८८.६६ | २ |
| ९ | नांदेड | ४१९ | १९५ | १५० | ७६.९२ | ८ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४१९ | १९५ | १५० | ७६.९२ | ३ |
| १० | यवतमाळ | ४,७८४ | ४,६९० | ३,५९२ | ७६.५९ | ९ |
| अमरावती विभाग | | ४,७८४ | ४,६९० | ३,५९२ | ७६.५९ | ४ |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | २३ | ६२.१६ | ११ |
| नाशिक विभाग | | ९८ | ३७ | २३ | ६२.१६ | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | ३८ | ५३.५२ | १२ |
| पुणे विभाग | | ७५ | ७१ | ३८ | ५३.५२ | ६ |
| एकूण | | १२,४५३ | ११,९६२ | १०,३२७ | ८६.३३ | |

# प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | एकुण कुटुंबांचे सर्वेक्षण | एकुण पात्र | एकुण नोंदणी | मंजूरी | पूर्ण घरकुले | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | २४८ | २०९ | १९७ | १९३ | १५० | ७७.७२ | २ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २४८ | २०९ | १९७ | १९३ | १५० | ७७.७२ | १ |
| २ | नाशिक | ३५७२ | २४८० | २४७१ | २०९० | ६३४ | ३०.३३ | ३ |
| ३ | अहिल्यानगर | ९५ | ८० | ७८ | ७८ | १४ | १७.९५ | ७ |
| नाशिक विभाग | | ३६६७ | २५६० | २५४९ | २१६८ | ६४८ | २९.८९ | २ |
| ४ | गडचिरोली | ८३२७ | ७०८८ | ६९७६ | ६८५५ | १९९६ | २९.१२ | ४ |
| ५ | चंद्रपूर | ८५१ | ४९३ | ४९१ | ४८५ | ८५ | १७.५३ | ८ |
| ६ | वर्धा | ६९५ | ३९६ | ३८६ | ३५६ | ३१ | ८.७१ | १२ |
| नागपूर विभाग | | ९८७३ | ७९७७ | ७८५३ | ७६९६ | २११२ | २७.४४ | ३ |
| ७ | रत्नागिरी | १०४९ | ६०२ | ५८३ | ४६९ | १०३ | २१.९६ | ५ |
| ८ | रायगड | १८५२६ | ११९८२ | ११८९९ | ११६२९ | २१४४ | १८.४४ | ६ |
| ९ | पालघर | ११७८९ | १०६७० | १०५७४ | १०४४१ | १२४० | ११.८८ | ९ |
| १० | ठाणे | १३४४६ | १२५९१ | १२१२० | ११८५१ | ९०९ | ७.६७ | १४ |
| ११ | सिंधुदुर्ग | १७५ | ६१ | ६१ | ४२ | १ | २.३८ | १५ |
| कोकण विभाग | | ४४९८५ | ३५९०६ | ३५२३७ | ३४४३२ | ४३९७ | १२.७७ | ४ |
| १२ | सातारा | ८६९ | ७१० | ६९८ | ३२७ | ३५ | १०.७० | १० |
| १३ | पुणे | २७०३ | २२३८ | १७४३ | ४८६ | ५० | १०.२९ | ११ |
| १४ | कोल्हापूर | २६ | १० | १० | १० | ० | ०.०० | १६ |
| पुणे विभाग | | ३५९८ | २९५८ | २४५१ | ८२३ | ८५ | १०.३३ | ५ |
| १५ | अमरावती | ३३ | २४ | २३ | २१ | २० | ९५.२४ | १ |
| १६ | यवतमाळ | १००३१ | ८०९४ | ७१६८ | ६८०२ | ५८० | ८.५३ | १३ |
| अमरावती विभाग | | १००६४ | ८११८ | ७१९१ | ६८२३ | ६०० | ८.७९ | ६ |
| एकूण | | ७२४३५ | ५७७२८ | ५५४७८ | ५२१३५ | ७९९२ | १५.३३ | |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | ४१ | ४१ | ४१ | १०० | २ |
| २ | बुलढाणा | ८६ | ८१ | ६३ | ७७.७८ | ५ |
| अमरावती विभाग | | १२७ | १२२ | १०४ | ८५.२५ | १ |
| ३ | रायगड | १२ | १२ | ११ | ९१.६७ | ३ |
| ४ | सिंधुदुर्ग | २१ | २१ | १२ | ५७.१४ | ९ |
| ५ | पालघर | ० | ० | ० | ०.०० | ३० |
| कोकण विभाग | | ३३ | ३३ | २३ | ६९.७० | २ |
| ६ | अहिल्यानगर | १५८ | १५५ | ८५ | ५४.८४ | १० |
| ७ | जळगाव | १९२ | १८६ | १०२ | ५४.८४ | ११ |
| ८ | नंदुरबार | २ | २ | ० | ०.०० | २७ |
| नाशिक विभाग | | ३५२ | ३४३ | १८७ | ५४.५२ | ३ |
| ९ | भंडारा | २२ | २१ | १९ | ९०.४८ | ४ |
| १० | गोंदिया | १५ | १३ | ८ | ६१.५४ | ७ |
| ११ | वर्धा | ७४५ | ४४८ | ८७ | १९.४२ | १४ |
| १२ | चंद्रपूर | ७२९ | २२६ | २१ | ९.२९ | १५ |
| १३ | गडचिरोली | ० | ० | ० | ०.०० | २४ |
| नागपूर विभाग | | १,५११ | ७०८ | १३५ | १९.०७ | ४ |
| १४ | नांदेड | ५ | ५ | ५ | १०० | १ |
| १५ | लातूर | २,४४५ | १,२५९ | ३५८ | २८.४४ | १२ |
| १६ | परभणी | ४,४०३ | ४,०७८ | ९८६ | २४.१८ | १३ |
| १७ | जालना | ७,०४८ | ६,१११ | ५५३ | ९.०५ | १६ |
| १८ | छत्रपती संभाजी नगर | ४,८१२ | ३,३८२ | ४९ | १.४५ | १९ |
| १९ | बीड | ५,७०० | ० | ० | ०.०० | २२ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २४,४१३ | १४,८३५ | १,९५१ | १३.१५ | ५ |
| २० | सातारा | २७३ | २०५ | १४४ | ७०.२४ | ६ |
| २१ | कोल्हापूर | ५२५ | ५२५ | ३०४ | ५७.९० | ८ |
| २२ | सोलापूर | २,०४५ | २,००६ | ८३ | ४.१४ | १७ |
| २३ | सांगली | ८४४ | ६७८ | १५ | २.२१ | १८ |
| २४ | पुणे | १,२३६ | ८९५ | ० | ०.०० | ३१ |
| पुणे विभाग | | ४,९२३ | ४,३०९ | ५४६ | १२.६७ | ६ |
| एकूण | | ३१,३५९ | २०,३५० | २,९४६ | १४.४८ | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | १५० | ११९ | १०२ | ८५.७१ | २ |
| कोकण विभाग | | १५० | ११९ | १०२ | ८५.७१ | १ |
| २ | जळगाव | १,०४९ | १,००९ | ६८७ | ६८.०९ | ६ |
| ३ | धुळे | १५२ | १४५ | ८२ | ५६.५५ | ८ |
| ४ | अहिल्यानगर | २० | २० | ५ | २५.०० | १३ |
| ५ | नंदुरबार | ३५ | ३१ | २ | ६.४५ | २० |
| नाशिक विभाग | | १,२५६ | १,२०५ | ७७६ | ६४.४० | २ |
| ६ | अमरावती | ५०७ | ४७६ | ३७६ | ७८.९९ | ४ |
| ७ | यवतमाळ | ६,१७८ | ५,४०८ | २,५७३ | ४७.५८ | ९ |
| ८ | बुलढाणा | ३०० | ४ | ० | ०.०० | २४ |
| अमरावती विभाग | | ६,९८५ | ५,८८८ | २,९४९ | ५०.०८ | ३ |
| ९ | गोंदिया | १,१६९ | १,११३ | ८५३ | ७६.६४ | ५ |
| १० | भंडारा | ३,२८४ | ३,१४० | १,९८३ | ६३.१५ | ७ |
| ११ | चंद्रपूर | १२,४९३ | १०,५८२ | ४,५५२ | ४३.०२ | १० |
| १२ | नागपूर | ७८० | ६१७ | ९२ | १४.९१ | १६ |
| १३ | वर्धा | ९२६ | ६७७ | ८७ | १२.८५ | १७ |
| १४ | गडचिरोली | १५० | १४२ | ० | ०.०० | २५ |
| नागपूर विभाग | | १८,८०२ | १६,२७१ | ७,५६७ | ४६.५१ | ४ |
| १५ | कोल्हापूर | १६५ | ६४ | ६० | ९३.७५ | १ |
| १६ | सातारा | २२६ | २१६ | १७५ | ८१.०२ | ३ |
| १७ | सांगली | १,०६१ | ८३८ | २०४ | २४.३४ | १४ |
| १८ | सोलापूर | २१४ | १५३ | १० | ६.५४ | १९ |
| १९ | पुणे | २० | ० | ० | ०.०० | २८ |
| पुणे विभाग | | १,६८६ | १,२७१ | ४४९ | ३५.३३ | ५ |
| २० | परभणी | ८९४ | ६१० | २१३ | ३४.९२ | ११ |
| २१ | धाराशिव | ३,७७२ | २,८०९ | ९७१ | ३४.५७ | १२ |
| २२ | जालना | ९,९६१ | ८,८६५ | २,१३४ | २४.०७ | १५ |
| २३ | लातूर | ४,३८५ | २,२५५ | २६३ | ११.६६ | १८ |
| २४ | छत्रपती संभाजी नगर | १,५४६ | ८८० | ८ | ०.९१ | २१ |
| २५ | बीड | १,८०० | ० | ० | ०.०० | २३ |
| २६ | नांदेड | १ | १ | ० | ०.०० | २७ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २२,३५९ | १५,४२० | ३,५८९ | २३.२७ | ६ |
| एकूण | | ५१,२३८ | ४०,१७४ | १५,४३२ | ३८.४१ | |

# मोदी आवास घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून, २०२५

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | १४,४२९ | १४,४२० | १२,८२९ | ८८.९७ | १ |
| २ | गडचिरोली | ६,५४८ | ६,५४८ | ५,५१० | ८४.१५ | २ |
| ३ | वर्धा | ४,९६५ | ४,९६५ | ३,७७८ | ७६.०९ | ३ |
| ४ | चंद्रपूर | १०,८७४ | १०,८७४ | ७,६६४ | ७०.४८ | ६ |
| ५ | भंडारा | ११,०३३ | ११,०३३ | ७,५९२ | ६८.८१ | ८ |
| ६ | नागपूर | ६,७४७ | ६,७४५ | ४,३१५ | ६३.९७ | ११ |
| | **नागपूर विभाग** | **५४,५९६** | **५४,५८५** | **४१,६८८** | **७६.३७** | **१** |
| ७ | रत्नागिरी | ६,३५६ | ६,३५६ | ४,२४७ | ६६.८२ | ९ |
| ८ | सिंधुदुर्ग | १,३०८ | १,३०८ | ८१३ | ६२.१६ | १२ |
| ९ | पालघर | ४५८ | ४५८ | २६५ | ५७.८६ | १५ |
| १० | ठाणे | २,५३८ | २,५३८ | १,४२९ | ५६.३० | १६ |
| ११ | रायगड | २,४५६ | २,४२० | १,२६२ | ५२.१५ | १९ |
| | **कोकण विभाग** | **१३,११६** | **१३,०८०** | **८,०१६** | **६१.२८** | **२** |
| १२ | अकोला | ७,३५३ | ७,३५३ | ५,४९९ | ७४.७९ | ४ |
| १३ | अमरावती | १४,१७८ | १४,१७८ | ९,८८६ | ६९.७३ | ७ |
| १४ | वाशिम | १२,४५५ | १२,४५५ | ८,०४७ | ६४.६१ | १० |
| १५ | यवतमाळ | २९,९९९ | २९,९९९ | १६,३३३ | ५४.४५ | १७ |
| १६ | बुलढाणा | १७,०५५ | १७,०५५ | ८,६१५ | ५०.५१ | २३ |
| | **अमरावती विभाग** | **८१,०४०** | **८१,०४०** | **४८,३८०** | **५९.७०** | **३** |
| १७ | सातारा | १,७७७ | १,७७७ | १,३०२ | ७३.२७ | ५ |
| १८ | सांगली | १,९५८ | १,९५८ | १,१८६ | ६०.५७ | १३ |
| १९ | कोल्हापूर | २,०३१ | २,०१४ | १,०४६ | ५१.९४ | २१ |
| २० | पुणे | १,५२१ | १,५१५ | ६९२ | ४५.६८ | २५ |
| २१ | सोलापूर | ११,०१९ | ११,०१८ | ४,९८५ | ४५.२४ | २६ |
| | **पुणे विभाग** | **१८,३०६** | **१८,२८२** | **९,२११** | **५०.३८** | **४** |
| २२ | नाशिक | ६,९८१ | ६,९८१ | ३,७३२ | ५३.४६ | १८ |
| २३ | अहिल्यानगर | ४,३५६ | ४,३३६ | २,२६१ | ५२.१४ | २० |
| २४ | जळगाव | २९,५३१ | २९,४६८ | १५,११८ | ५१.५७ | २२ |
| २५ | धुळे | ९,७०९ | ९,७०९ | ३,५३० | ३६.३६ | ३३ |
| २६ | नंदुरबार | २,८७६ | २,८७६ | ७४६ | २५.९४ | ३४ |
| | **नाशिक विभाग** | **५३,४५३** | **५३,३७०** | **२५,४६७** | **४७.७२** | **५** |
| २७ | छत्रपती संभाजी नगर | ५,८१२ | ५,४६० | ३,१७३ | ५८.११ | १४ |
| २८ | बीड | १६,०४१ | १६,०३९ | ७,७६९ | ४८.४४ | २४ |
| २९ | धाराशिव | २,२७४ | २,२७४ | १,०१६ | ४४.६८ | २७ |
| ३० | जालना | ८,४९६ | ८,३५४ | ३,७१२ | ४४.४३ | २८ |
| ३१ | लातूर | ६,३१८ | ६,३१८ | २,७५५ | ४३.६१ | २९ |
| ३२ | नांदेड | २३,५९८ | २३,५९६ | १०,१५७ | ४३.०५ | ३० |
| ३३ | हिंगोली | ३,३५४ | ३,३५३ | १,४०२ | ४१.८१ | ३१ |
| ३४ | परभणी | १३,५९६ | १३,५८१ | ५,६२८ | ४१.४४ | ३२ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **७९,४८९** | **७८,९७५** | **३५,६१२** | **४५.०९** | **६** |
| | **एकूण** | **३,००,०००** | **२,९९,३३२** | **१,६८,३७४** | **५६.२५** | |

# गृहसंकुल उभारणीमुळे स्वतःच्या पक्क्या घरकुलाची स्वप्नपुर्ती

ससेगाव ग्रामपंचायत नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात आहे. या ग्रामपंचायती अंतर्गत गोपाळ टोली गावातील बहुतेक कुटुंबे अनेक वर्षांपासून झोपडीत वास्तव्य करत होती. मोल मजुरी हेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होते. काही कुटुंबांकडे बकरी आणि गाई सारखी जनावरे आहेत,परंतु येथे माणसांकरीता सुरक्षित व पक्क्या घरांची व्यवस्था नव्हती तर जनावरांचे तर सोडूनचं द्या. अशा हलाखीच्या परिस्थिती हे सर्व लोक राहतं होते.

यामध्ये इतर प्रवर्गातील २४ कुटुंब पत्रा,दगड, मातीच्या झोपड्यांमध्ये अतिक्रमण करुन राहत होते. या लोकांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे ते स्वमालकीची जागा खरेदी करु शकत नव्हते किंवा घराचे बांधकामही करू शकत नव्हते. असे जवळपास गावात ७५ कुटुंबे गावात वास्तव्यास होती. या लोकांना हक्काचा पक्का निवारा देण्यासाठी ग्रामपंचायत ससेगावने गावठाणाची जागा गोपाळ टोली येथील **एकूण ७५** लाभधारकांना देण्याचा ग्रामपंचायतीचा ठराव घेवून तसा प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कुही यांचेकडे सादर केला. गट विकास अधिकारी यांनी गावठानाची १ एकर जागा नियमानुकुल करण्यासाठी प्रदत्त समितीकडे मंजूरी करीता प्रस्ताव सादर करताच या प्रस्तावास मंजुरी मिळाली. त्यानुसार तहसिल कार्यालयाने प्रती घरकुल ५०० चौ. फुट जागेचे पट्टे पाडून लाभार्थींना पट्टे वाटप करण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २४ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता मंजूरी प्रदान करण्यात आली. या २४ लाभार्थ्यांचा जागेचा व घरकुल मंजुरीचा प्रश्न मार्गी लागताच ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत या लाभार्थ्यांसाठी गृहसंकुल उभारणीचा निर्णय घेण्यात आला.

ससेगाव ग्रामपंचायती मधील गोपाळ टोली गावातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत या २४ लाभार्थ्यांनी घरकुलांना मंजुरी मिळताच घरकुल बांधकामास सुरूवात केली. बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांच्या बँक खाती सर्व हप्ते विनाविलंब जमा करण्यात आले. त्यामुळे या २४ लाभार्थ्यांचे गृहसंकुलाचे बांधकाम जलद गतीने व गुणवत्तापूर्ण झाले. महा आवास अभियानात गृहसंकुल उभारणीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे झोपडीत वास्तव्य करणारे कुटुंब आज हक्काच्या पक्क्या घरात आनंदाने राहत आहे. **आणखी ११ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये घरकुले मंजूर करण्यात आली असून** त्यांचे घरकुल बांधकाम प्रगतीत आहे. त्याचप्रमाणे **४० कुटुंबांचे सर्वेक्षण प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ मध्ये करण्यात आले आहे**.

या गृहसंकुलाचे बांधकाम ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत गावातील युवकांनी केले असून यामुळे गावकऱ्यांना केवळ घरेच नव्हे तर रोजगारही मिळाला आहे. यामुळे स्थानिक पातळीवर कुशल गवंड्यासह रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध झाल्याने आत्मनिर्भरतेचा मार्गही मोकळा झाला आहे.

या गृहसंकुलास ग्रामपंचायतीने **रस्ता, सांडपाणी व्यवस्थापणासाठी ड्रेनेज सिस्टीम**,परिसर सौंदर्यात भर घालणार बाग, पिण्याचे पाणी, इ. नागरी सुविधांची उपलब्धता केली आहे. हा प्रकल्प **ग्रामपंचायत आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त प्रयत्नातून** उभारण्यात आला असून त्याची अंमलबजावणी पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली. केंद्र शासनाचे "**सर्वांसाठी घरे**" **आणि** "**आत्मनिर्भर भारत**" या धोरणांना बळ देणारा उपक्रम ससेगाव सारख्या ग्रामीण भागात नवजीवन निर्माण करणारा आहे.

मानवी जीवनातील निवारा ही मुलभूत गरज गृहसंकुलामुळे पूर्ण झाल्यामुळे ग्रामीण जनतेचे सामाजिक जीवनमान उंचावत असल्याची प्रतिक्रिया ससेगावातील ग्रामस्थांकडून येत आहे.





# महा आवास अभियानात उभारलेली बहुमजली इमारत ठरली मानबिंदू

बेलुरा हे सांस्कृतिकदृष्ट्या चैतन्यशील असलेले अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात वसलेले गाव आहे. या गावाला ऐतिहासिक वारसा लाभला असून विशेषतः उंच आणि भव्य नरनाळा किल्ला शाश्वत शक्तीचे प्रतीक आहे. या गावातील श्री.पंजाब तुळशीराम सोळंके यांनी सन २०२२ मध्ये शासनाच्या महत्त्वाकांक्षी महा आवास अभियानात शबरी आवास योजने अंतर्गत बहुमजली इमारतीची उभारणी करून बेलुरा गावातील ग्रामस्थांसाठी एक प्रेरणा बनले आहे.

श्री.पंजाब तुळशीराम सोळंके आपल्या पत्नी आणि दोन मुलांसह बराच काळापासून एका जीर्ण झोपडीत राहत होते. जी हवामानाच्या तीव्रतेला बळी पडणारी होती आणि फारशी सुरक्षितता देत नव्हती. महा आवास अभियानात शबरी आवास योजने अंतर्गत श्री.पंजाब सोळंके यांना ग्रामपंचायतीने बहुमजली इमारत उभारणी बाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार श्री.पंजाब सोळंके यांनी स्थानिक कामगारांचा वापर करून ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सल्ल्याने व मार्गदर्शनाखाली एक हॉल, स्वयंपाकघर, शौचालय, बेडरूम एक प्रशस्त तळमजला वरच्या मजल्यावर दोन अतिरिक्त खोल्या आणि एक बाल्कनी अशा प्रकारे बहुमजली इमारतीची उभारणी केली. पावसाचे पाणी साठवणे आणि स्वच्छतेसाठी सेप्टिक टँक बांधण्यात आला. स्थानिक स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने एक छोटासा सौर पॅनेल घरावर बसविण्यात आला. मर्यादित निधी असल्याने श्री.पंजाब सोळंके यांनी वैयक्तिक कर्ज आणि कुटुंबातील सदस्यांच्या योगदानामुळे कमी बजेटमध्ये सुंदर घर पूर्ण करण्यात यश मिळवले. जशी रचना आकार घेत होती, तसतसे कुतूहल कौतुकात बदलले. एकेकाळी दोन मजली घराच्या गरजेबद्दल प्रश्न विचारणारे गावकरी आता शब्दशः आणि लाक्षणिकरित्या पंजाबच्या घराकडे पाहू लागले. ग्रामसभेत वडीलधाऱ्यांनी या नवोपक्रमावर चर्चा केली.

श्री.पंजाब सोळंके यांनी उभारलेल्या सुंदर बहुमजली इमारतीची चर्चा संपूर्ण तालुक्यात पसरली त्यामुळे त्यांच्या गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता अकोट तालुक्याचे आमदार, लोकप्रतिनिधी, जिल्हा, तालुका स्तरावरील अधिकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या या बहुमजली इमारतीला जिल्हा वृत्तपत्रात आणि ग्रामीण नवोपक्रमाचे प्रतिक म्हणून सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्यापक प्रसिध्दी देण्यात आली. या बहुमजली इमारतीमुळे श्री.पंजाब तुळशीराम सोळंके व त्यांच्या कुटुंबावर सर्वांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

श्री.पंजाब सोळंके यांचा बहुमजली इमारत उभारणी उपक्रमाचा जोरदार परिणाम झाला असून त्यांच्या यशाने प्रेरित होऊन बेलुरा गावातील इतर तीन कुटुंबांनी बहुमजली इमारती उभारणीच्या पर्यायाला पसंती दिली आहे. त्यांच्या या उपक्रमाबाबत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद बैठकांमध्ये कार्यक्षम जमिनीच्या वापराविषयी चर्चा सातत्याने होत आहे.

श्री.पंजाब तुळशीराम सोळंके यांची बहुमजली इमारत उभारणी करतांना गावातील तरुणांनी वास्तुकला आणि स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये रस दाखवला.त्यामुळे स्थानिक गवंडी आणि कामगारांना बहुमजली बांधकामाचे प्रशिक्षण मिळाले. यामुळे त्यांची रोजगारक्षमता वाढली असून त्यांची मागणी वाढली आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांची कामगारावरून कारागिर अशी पदोन्नती झाल्यामुळे गावात अभिमानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

बेलुरा आता नकाशावर फक्त एक बिंदू राहिला नसून ते प्रगतीचे गाव म्हणून उदयास आले आहे. महा आवास अभियानांतर्गत शबरी आवास योजनेमुळे हे सर्व शक्य झाले, अन्यथा हे यश शक्य झाले नसते. असे लाभार्थी श्री.पंजाब तुळशीराम सोळंके यांनी सांगितले.



# गृहसंकुलामुळे बेघर व भुमिहीनांना मिळाले जागेसह घरकुल

भिल्ल समाज हा आदिवासी जमातीचा एक घटक असून यांच्यातील बहुतांश लोकांकडे राहण्यास पक्की घरी नसल्याने वस्ती करून कुडा, माती व पत्र्याच्या झोपड्यांमध्ये राहतात. अशीच एक ४५ कुटुंबांची वस्ती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यामधील गणोरी गावात होती. या लोकांकडे स्वतःची जागा नसल्याने वनविभागाच्या जमिनीवर अतिक्रमण करून कित्येक वर्षापासुन या जागेवर कुडा-पत्र्याच्या घरात वास्तव्यास होती. या वनविभागाच्या जमिनीवर पिढ्यानपिढ्या हे लोक राहत असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यामुळे यांनी स्वतः पुढाकार घेवून घर बांधणे तर दुरच पण जागा विकत घेणेही त्यांना शक्य नव्हते.

ग्रामपंचायत कार्यकारणी व ग्रामस्थांनी पुढाकार घेवून सन-२०१६-१७ या वर्षात या भिल्ल समाजातील २१ कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजुर करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. परंतु यांच्याकडे स्वतःची जागा नसल्याने त्यांना घरकुलाचा लाभ देता येत नव्हता. सन २०१७-१८ मध्ये या लाभार्थ्यांना पुन्हा घरकुलासाठी प्रयत्न केले, परंतु त्यांच्याकडे घरकुल बांधकामासाठी जागा नसल्याचे कारण देण्यात आले. असेच काही सन २०१८-१९ मध्येही घडले मात्र त्यांनी पाठपुरावा सोडला नाही. त्यांची घरासाठीची तळमळ पाहता सन २०२०-२१ मध्ये गणोरी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्राम विकास अधिकारी आणि काही पुढारी मंडळींनी पुढाकार घेवून यांना घरकुल देण्याचे ठरविले. याकरीता त्यांनी त्यांच्या वस्तीत जावून शासनाच्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना, जागा खरेदी अर्थसहाय्य योजना व आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती दिली.

घरकुल योजना व जागा खरेदी करणेबाबत सर्वांनी जरी मार्गदर्शन केले असले तरी या लोकांकडे घर बांधायला जमा रक्कम सुध्दा नसल्याने यांच्या अडचणी वाढतच होत्या. त्यांच्या अडचणींवर मार्ग काढण्याकरीता छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली या लोकांच्या वस्तीवर बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये प्रकल्प संचालकांनी या लोकांना पंडित दीनदयाळ उपाध्याय अर्थसहाय्य योजनेमधून जागा खरेदी करण्यास सांगितले. तसेच या सर्व लाभार्थ्यांना जागा मिळवून देणे व आवश्यक सर्व कागदपत्राची पुर्तता करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांची असल्याचे प्रकल्प संचालकांनी सांगितले. त्यानुसार सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांनी जागा शोधून पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून या सर्व लाभार्थ्यांसाठी २० गुंठे जागा खरेदी केली. सर्व शासकीय कार्यवाही पूर्ण करून या जागेच्या नोंदी लाभार्थ्यांच्या नावावर करण्यात आल्या.

पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य या योजनेचा प्रस्ताव फुलंब्री पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचेमार्फत प्रकल्प संचालक यांच्याकडे पाठविण्यात आला. प्रकल्प संचालक यांनी या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करून प्रस्ताव मंजुरीची सर्व कार्यवाही अत्यंत कमी कालावधीत पूर्ण केली. या सर्व भूमिहीन लाभार्थ्यांना स्वतःची जागा मिळाल्याने त्यांच्या हक्काचे घराचे स्वप्न होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने सर्व लाभार्थी अत्यंत आनंदी झाले.

या सर्व लाभार्थ्यांची पैशाची अडचण लक्षात घेता त्यांच्यासाठी गृहसंकुल उभारणीचा निर्णय त्यांच्या सहमतीने घेण्यात आला. सर्व ग्रामस्थ, पदाधिकारी व शासकीय यंत्रणेच्या मदतीने या भिल्ल समाजाच्या लाभार्थ्यांसाठी गणोरी गावात गृहसंकुलाचे काम पूर्ण करण्यात आले. यामुळे या सर्व गरीब, गरजु, बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना हक्काचा पक्का निवारा मिळाल्याने हे सर्व लाभार्थी आनंदाने गृहसंकुलात राहत आहेत.





# आदिवासी कुटुंबांनी साकरली कमी जागेत बहुमजली इमारत

नंदुरबार हा सातपुडा प्रदेशातील एक आदिवासी (tribal ) जिल्हा असून गुजरात व मध्यप्रदेश राज्याच्या सीमेजवळ आहे. नंदुरबार जिल्हा आदिवासी सुसंस्कृती आणि जीवनशैली, प्रकाशे -शहादा तालुक्यात तापी-गोमाई संगमावरील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र (दक्षिण काशी ), शहादा तालुक्यात उनबदेव येथे गरम पाण्याचे झरे, तोरणमाळ हे थंड हवेचे ठिकाण, वन्यजीव आणि मनमोहक निसर्ग, इ. प्रसिध्द बाबींसाठी प्रामुख्याने ओळखला जातो. अशा या नंदुरबार जिल्ह्यातील व तालुक्यातील ढेकवद गावामध्ये श्री. तिज्या रेसा वसावे व श्री. राजेश तिज्या वसावे यांनी कमी जागेत उभारलेल्या बहुमजली इमारतीची ही यशोगाथा आहे.

श्री. तिज्या रेसा वसावे व श्री. राजेश तिज्या वसावे हे दोन कुटुंब एका लहानशा कुडा मातीच्या कच्च्या झोपडीत राहत होते. बिकट आर्थिक परिस्थिती व जागेची कमतरता यामुळे त्यांचे पक्क्या घराचे स्वप्न कधी पूर्ण होईल, याची आस त्यांना लागली होती.

ढेकवद ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या सहकार्याने श्री.तिज्या रेसा वसावे व श्री.राजेश तिज्या वसावे या दोन्ही लाभार्थ्यांना



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजुर करण्यात आले. परंतु घरकुल बांधकामाकरीता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने त्यांना घरकुल बांधकामास अडचण निर्माण झाली होती.



सन २०२३-२४ मध्ये राज्यात राबविण्यात आलेल्या महा आवास अभियाना मध्ये कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी बहुमजली इमारती उभारणी उपक्रमाबाबत या दोन्ही लाभार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. या दोन्ही लाभार्थ्यांचा उदरनिर्वाह हातमजूरी करून होत असल्याने त्यांची घरकुल बांधकामासाठी जागा विकत घेण्याची परिस्थिती नव्हती. त्यामुळे या लाभार्थ्यांनी बहुमजली इमारत उभारणीच्या पर्यायाची निवड केली. त्यांना पहिला हप्ता मिळताच घरकुल बांधकामास सुरूवात केली. घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्ते वेळेत या दोन्ही लाभार्थ्यांच्या बँक खाती जमा करण्यात आले. त्यामुळे अत्यंत अल्प कालावधीत या लाभार्थ्यांनी दोन मजली (G+१) इमारतीची उभारणी केली.

बहुमजली इमारत उभारणीच्या माध्यमातून घरकुलासोबतच या लाभार्थ्यांना अभियानातील शासकीय योजनांशी कृती संगम उपक्रमा अंतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजने मधून मनुष्य दिवस रोजगार, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मधून शौचालय, जल जीवन मिशन मधून नळ जोडणी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजने मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून उपजिवीकेचे साधन, इ. शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली असून श्री. तिज्या रेसा वसावे व श्री. राजेश तिज्या वसावे हे दोन्ही लाभार्थी आपल्या कुटुंबा समवेत आनंदाने वास्तव्य करीत आहेत.



# यशवंतराव चव्हाण मुक्त वसहात योजनेतून गृहसंकुलाची उभारणी

शिरवडे या गावात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंतर्गत गृहसंकुल उभारून गरीब, गरजु, बेघर व भुमिहीन लाभार्थ्यांचे हक्क्याच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. ग्रामीण भागातील पात्र लाभार्थ्यांना हक्काचा निवारा देण्यासाठी राज्यात विविध ग्रामीण आवास योजना राबविण्यात येतात. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने अंतर्गत भटके व विमुक्त प्रवर्गातील गरजू कुटुंबाना लाभ देणेत येतो. या योजने अंतर्गत सातारा जिल्हयातील कराड पंचायत समिती अंतर्गत शिरवडे गावातील १० लाभार्थ्यांनी एकत्र येवून गृहसंकुलाची उभारणी केली आहे.

शिरवडे गावात काही कुटुंबे नंदीवाले वस्ती मध्ये कच्च्या कौलारू घरात राहत होती. हे सर्व लोक मोलमूजरी करून उदरनिर्वाह करत असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची होती. त्यामुळे पक्क्या घरामध्ये राहण्याचे स्वप्न पूर्ण होते कि नाही याबाबत त्यांना खात्री नव्हती. परंतु शिरवडे ग्रामपंचायतीच्या ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती ज्योती जाधव व सर्व ग्रामपंचायत कार्यकारणी यांनी प्रत्यक्ष घरांना भेटी देवून स्थळ पाहणी करून या लोकांशी चर्चा केली.



या लाभार्थ्यांना घरकुल योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यात आली. या सर्व लोकांची ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मिंटीग घेऊन विविध घरकुल योजना व बांधकामाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. घरकुल बांधकाम करणेबाबत या लोकांनी प्रतिसाद दिल्याने यांचे प्रस्ताव तयार करून कारड पंचायत समितीकडे सादर करण्यात आले. या सर्व लोकांच्या घरकुलास मंजूरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष या लाभार्थ्यांना भेट देवून सातारा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व कराड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.प्रताप पाटील यांनी लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व देय अनुदानाबाबत मार्गदर्शन केले.

श्री.आनंदा नरसु देशमुख, श्री.आनंदा वासुदेव लोहार, श्री.अशोक आण्णा पवार, श्री.अशोक शंकर पवार, श्रीमती किसाबाई किसान पवार, श्री.रमेश शंकर पवार, श्री.संतोष काशिनाथ पवार, श्रीमती जयश्री दिलीप पवार, श्री.सुभाष रामचंद्र पवार व श्री.तानाजी नरसु देशमुख या १० लाभार्थ्यांना गृहसंकुल उभारणीतून हक्काचे पक्के घर मिळाले आहे.

या सर्व लाभार्थ्यांना घरकुलासह महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून रू.२६०८०/-, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण मधून शौचालयासाठी रू.१२०००/- प्रोत्साहनपर अनुदान मिळाले. तसेच शिरवडे ग्रामपंचायतीच्या प्रयत्नातून या गृहसंकुलांकरीता वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत गटार व रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून दिली. या सर्व लाभार्थ्यांना ग्रामपंचायती मार्फत उज्वला गॅस कनेक्शन, वैयक्तिक पिण्याच्या पाण्याकरीता नळ कनेक्शन, स्वतंत्र लाईट कनेक्शन, इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर लाभार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने रुफ टॉप रेन हार्वेस्टिंग, परसबाग व घरातील कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती असे विविध उपक्रम राबविले आहेत. गृहसंकुलातील प्रत्येक महिला उमेद अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील बचत गटामध्ये सहभागी असून त्याचा लाभही घेत आहेत. या सर्व बाबीमुळे शिरवडे गावात १० घरांचे उत्कृष्ट असे गृहसंकुल उभारण्यात आले असून हे सर्व लाभार्थी त्यांच्या कुंटुंबासह यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने अंतर्गत मिळालेल्या या घरकुलात आनंदाने व समाधानाने वास्तव्य करीत आहेत.

त्यांना मिळालेल्या हक्काच्या व पक्कया घरकुलासाठी त्यांनी राज्य शासनाचे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा, पंचायत समिती कराड व ग्रामपंचायत कार्यालयातील सर्व अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले आहे.



# प्रधानमंत्री-जनमन योजनेमुळे आदिवासी कुटुंबांना मिळाला निवारा

पार्ले हे मध्य कोकणातील रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यामधील एक गाव आहे. या गावात पावसाचे प्रमाण अत्यंत जास्त आहे. या गावामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास कामांची अंमलबजावणी ग्रामपंचायत कार्यालयामार्फत करण्यात येते. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा ध्वजांकीत कार्यक्रम 'सर्वांसाठी घरे' याचाही समावेश आहे. अशीच काही यशोगाथा श्री. बाबू सायबू जाधव व श्री. तुकाराम सायबू जाधव यांना मिळालेल्या घरकुलाची आहे.

श्री.बाबू सायबू जाधव व श्री.तुकाराम सायबू जाधव हे पार्ले गावातील रहिवाशी असून दोघेही भाऊ आहेत. आधी दोन कुटुंब एका कच्या मातीचे घरात राहत असल्याने कमी जागेमुळे एकत्र राहण्यास फार अडचण निर्माण झाली होती. त्यामध्ये त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने घर बांधणे जवळ जवळ त्यांना अशक्यच झाले होते. करणार काय त्यांच्याकडे या कमकुवत घरात दाटीने राहण्याशिवाय पर्यायही नव्हता.

अशातच राज्य शासनाने गरिब, गरजु, बेघर व भुमिहीन लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महा आवास अभियान सुरू केले. त्यासाठी ग्रामस्तरावर अभियानाची क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला हे दोघेही भाऊ उपस्थित असल्याने आपलेही घराचे स्वप्न पूर्ण होवू शकते, असे त्यांना वाटू लागले. श्री.बाबू सायबू जाधव व श्री.तुकाराम सायबू जाधव या दोन्ही भावांनी थोडाही विलंब न करता थेट पार्ले ग्रामपंचायत गाठले आणि घरकुल योजनेची माहिती घेवून घरकुलाची मागणी केली. त्यानुसार ग्रामपंचायतीचे सरपंच, सर्व सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी श्री.पाचाडकर यांनी प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान अंतर्गत श्री.बाबू सायबू जाधव व श्री.तुकाराम सायबू जाधव यांच्या घरकुल मंजूर प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठविला.

श्री.बाबू सायबू जाधव व श्री.तुकाराम सायबू जाधव यांचे प्रधानमंत्री-जनमन अंतर्गत घरकुल मंजुर झाले, परंतु त्यांच्याकडे घरकुल बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने कमी जागेत दोन घरे कशी बांधावी हा प्रश्न निर्माण झाला. त्याबाबत ग्रामपंचायत अधिकारी यांनी या दोन्ही लाभार्थ्यांना पोलादपूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचेकडे मार्गदर्शनाकरीता घेऊन गेले. त्यानुसार गट विकास अधिकारी यांनी महा आवास अभिनातील कमी जागेत जास्त लाभार्थी समावण्यासाठी बहुमजली इमारती उभारणीच्या उपक्रमाबाबत माहिती दिली. या पर्यायाला दोन्ही भावांनी सहमती दाखवली व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सल्ल्याने घरकुलाचे बांधकाम सुरू केले. बहुमजली इमारतीमुळे या दोन्ही लाभार्थ्यांचे पक्क्या घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

सर्व सुविधायुक्त घरकुल मिळाल्याबद्दल श्री.बाबू सायबू जाधव व श्री.तुकाराम सायबू जाधव या दोन्ही लाभार्थ्यांनी शासनाचे आभार मानले.










विजेते
प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण
सिंधुदुर्ग
सातारा
प्रथम क्रमांक
द्वितीय क्रमांक
तृतीय क्रमांक


अमृत महाआवास अभियान पुरस्कार
राज्यातील सर्वोत्कृष्ट गृहसंकुले
पुरस्कार विजेते
प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण
प्रथम
द्वितीय
तृतीय









# मिडीया कवरेज

## अमृत महाआवास अभियानात अहिल्यानगर जिल्ह्यात पुरस्कारांचा षटकार

अभियानकाळात जिल्ह्यात बांधली २०३६४ घरकुले

जिल्ह्यात १० गृहसंकुले

मिळालेले पुरस्कार

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ

## अमृत महाआवास अभियानात राज्यात जिल्हा तृतीय स्थानी

आज होणार पुरस्काराचे वितरण : सोहळ्याचे थेट प्रक्षेपण सर्व पंचायत समितींत

## महाआवास अभियानात सातारा जिल्ह्याचा डंका

पुणे येथे ना. शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते झाला सन्मान

## भांबोली येथे विकासकामांचे लोकार्पण

## घरकुल लाभार्थ्यांना गायरान जमीनीवर प्लॉट देणार : आ. विलास भुमरे

घरकुल योजनेच्या अंमलबजावणीसाठी आढावा बैठक

## पिंपर्डे रेतीघाटावरून मिळणार मोफत रेती

## दहा वर्षात बांधणार ३५ लाख घरे

महिला, ज्येष्ठ, दिव्यांगांसाठी गृहनिर्माण धोरण

## घरकुल लाभापासून कोणीही वंचित राहू नये

आ. पवार यांचे पंचायत समिती प्रशासनाला निर्देश

## ६५० घरकुल लाभार्थ्यांना १३०० ब्रास रेतीचे वितरण

## प्रधानमंत्री आवास प्लस टप्पा २ सर्वेक्षणाचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा

जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी कावली मेघना व डॉ तुबाकले यांचे आवाहन

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या टप्पा-२ सर्वेक्षणाला १८ जूनपर्यंत मुदतवाढ, आमदारांच्या प्रयत्नाला यश

## अवैध उत्खनन, जप्त साठ्यातून घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू!

जिल्हाधिकाऱ्यांचा जिल्ह्यातील तहसीलदारांना आदेश; २७ हजार लाभार्थ्यांना मिळणार लाभ

१,३७ लाख

## जिल्ह्यातील कातकरी बांधवांना आता हक्काचं घरकुल!

२५७

## लाखों गरीबों को मिला अपना खुद का आवास

## 'प्रधानमंत्री आवास'मधून २८ हजार ४१७ घरकुले मंजूर

'आरक्षित'सह खुल्या प्रवर्गास फायदा; लवकरच होणार उभारणी पूर्ण

## सीईओंनी नारायणपूर येथे केली घरकुल बांधकामाची पाहणी

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वाहतूक परवाना

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणास झाली सुरुवात

## घरकुल योजनेत जिल्हा अग्रेसर

## आता मिळणार सामान्य नागरिक व बेघरांना आपल्या हक्काचे घर

## घराचे स्वप्न होणार साकार

## पंतप्रधान घरकुल योजनेचे उत्कृष्ट काम केल्यामुळे गोपाळ पाळवदे यांचा सन्मान

## पीएम आवास योजनेंतर्गत पुन्हा १८ हजार ७९९ घरकुलांना मंजुरी

## कुंटूर येथील रमाई व प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलांची विडिओ कढून पाहणी; घरकुल बांधकाम करणाऱ्यांना बिल मिळणार

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत फुलवळ येथे लाभार्थ्यांचे सर्वेक्षण सुरु

## घरकुलाची फाइल पूर्ण करा, मगच रक्कम टाका : सीईओ

## जिल्ह्यातील एक हजार कातकरी कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

## बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांचा गृहप्रवेश

## आता घरकुल विभागावर सीसीटीव्हीची राहणार नजर




ग्राम विकास व पंचायत राज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस




ग्राम विकास व पंचायत राज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे 'महा आवास त्रैमासिकाचे' प्रकाशन



ग्राम विकास व पंचायत राज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे 'महा आवास अभियान डॅशबोर्डचे' उद्घाटन




ग्राम विकास व पंचायत राज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे 'भूमीलाभ पोर्टलचे' उद्घाटन

“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
राज्यातील सर्वांसाठी आवास”




संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

Email ID : directoriayruralhousing@gmail.com

दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४